# Key to
# Navjeevan Practice Book

Standard
**7**

**Teacher's Copy**

# मराठी सुलभभारती

NAVJEEVAN
PUBLICATIONS PVT. LTD.
MUMBAI ★ PUNE



## अनुक्रमणिका



| अ.क्र. | धड्याचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रार्थना | 3 |
| २. | श्यामचे बंधुप्रेम | 3 |
| ३. | माझ्या अंगणात | 7 |
| ४. | गोपाळचे शौर्य | 10 |
| ५. | दादास पत्र | 15 |
| ६. | टप् टप् पडती | 17 |
| ७. | आजारी पडण्याचा प्रयोग | 20 |
| ८. | शब्दांचे घर | 27 |
| ९. | वाचनाचे वेड | 29 |
| १०. | पंडिता रमाबाई | 34 |
| ११. | लेक | 39 |
| १२. | रोजनिशी | 43 |
| १३. | अदलाबदल | 47 |
| १४. | संतवाणी | 51 |
| * | आम्ही कथा लिहितो | 51 |
| * | निबंध लेखन | 53 |
| * | पत्र लेखन | 56 |
| * | बातमी लेखन | 57 |
| * | सूचना फलक | 58 |
| * | जाहिरात | 59 |

भाग – १

## १. प्रार्थना

**विद्यार्थ्यांनी स्वतः कृती करा.**

---

## २. श्यामचे बंधुप्रेम

**स्वाध्याय**

**प्र.१.** (अ) नवीन पाऊस सुरू झाल्यावर मातीचा एक रम्य सुंदर वास सुटतो.

(आ) खाऊच्या पैशांतून लहान भावास नवीन कोट किंवा सदरा शिवायचा असा निश्चय श्यामने केला होता.

(इ) श्यामच्या आईने लहान भावास सांगितले, तुझे अण्णा, दादा मोठे होतील, कामधंद्याला लागतील. मग तुला सहा महिन्यांनी नवीन सदरा शिवतील. अशा प्रकारे आईने लहान भावास समजावले.

(ई) श्यामचे वडील कोर्ट–कचेरीच्या कामासाठी वरचेवर दापोलीला जात.

(उ) खाऊच्या पैशांतून लहान भावासाठी शिवलेला कोट घेऊन कधी एकदा त्याला नेऊन देतो असे श्यामला झाले होते. म्हणून त्याला चालण्याचे श्रम वाटत नव्हते.

**प्र.२.** श्यामला थंडीच्या दिवसांत न मिळणाऱ्या गोष्टी

- **मफलर**
- **जाकिटे**
- **गरम कोट**

**प्र.३.** (अ) स्वत:साठी खाऊचा एकही पैसा न खर्च करता त्या पैशांतून श्यामने लहान भावासाठी नवीन कोट शिवला. नवीन कोट मिळाल्यावर भावाला होणाऱ्या आनंदाचा विचार मनात आला. त्याचा हट्ट आपण पूर्ण करू शकलो म्हणून श्यामचे डोळे अश्रूंनी न्हाले होते.

(आ) श्याम ज्यांच्या घरी राहायचा त्यांना श्यामची काळजी वाटत होती. पावसाळ्याचे दिवस होते. नदीनाल्यांना पूर आले असतील. अशा परिस्थितीत श्यामने जाणे त्याच्या जीवाला धोकादायक होते. म्हणून श्याम ज्यांच्या घरी राहायचा त्यांनी 'जाऊ नको' असे म्हटले.

(इ) पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे नदीनाल्यांना पूर आल्याने.पिसईच्या पऱ्ह्याला ओढ फार असल्यामुळे तो दुथडी भरून वाहत होता.



(ई) वडिलांनी दिलेले खाऊचे पैसे स्वत:साठी खर्च न करता श्यामने लहान भावासाठी नवीन कोट शिवला. तो कोट घरी घेऊन येण्यासाठी श्यामला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. श्यामचे आपल्या लहान भावावरील नि:स्वार्थी प्रेम पाहून आईला गहिवर आला.

**कृतिपत्रिका – १**

**उतारा क्र. १**

**प्र.१.** (अ) (१) (i) दापोली

(ii) गंधवती पृथ्वी

(२) (i) श्यामने शिंप्याकडे जाताना घेतलेल्या वस्तू

- **दोन वार कापड**
- **अर्धा वार अस्तर**

(ii) लेखकाच्या घरातील माणसे

- **आई**
- **श्याम**
- **वडील**
- **श्यामचे भाऊ**

सूचना :Practice Book मध्ये ३ Box दिलेले आहेत जे ४ आहेत.

(३) मी माझ्या भावासाठी नेहमी बुद्धीला चालना आणि हातांना काम देणारे खेळ घेतो. असे खेळ दिल्यामुळे त्यालाही गुंतवून ठेवता येते. आता तो बऱ्यापैकी मोठा झाला आहे. त्यामुळे त्याच्यासाठी मी आता चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके घेतो. छोटे छोटे प्रयोग असणारी विज्ञानाची पुस्तके घेतो. या भेटवस्तू मी त्याला त्याच्या वाढदिवसाला देतो. मे महिन्याच्या सुट्टीत आणि दिवाळीच्या सणाला देतो.

**कृतिपत्रिका – २**

**उतारा क्र. २**

**प्र.१.** (अ) (१) (i) खळखळ (ii) नानेटी

(२) (i) चूक (ii) बरोबर

(४) श्यामच्या धाकट्या भावाचा सदरा फाटला होता. श्याम दापोलीस शिकण्यासाठी होता. तेथे त्याने स्वत:च्या खाऊच्या पैशातून भावासाठी

नवीन कोट शिवून घेतला. गणेश चतुर्थीला घरी जाण्यासाठी तो कोट घेऊन निघाला तेव्हा पावसापाण्याचे दिवस होते. तेव्हा त्याच्या मनात आले पंख असते तर एकदम उडून गेलो असतो. कारण श्यामला स्वत:च्या पैशातून शिवलेला कोट कधी एकदा भावाला नेऊन देतो असे झाले होते आणि श्याम ज्या रस्त्याने घरी येणार होता त्या मार्गात असलेले पिसईचा पऱ्ह्या, सोंडघरचा पऱ्ह्या दुथडी भरून वाहत होते. त्यांना उतारही नव्हता. त्यामुळे त्याला जाण्यासाठी वेळही लागणार होता आणि अनेक अडचणींचा सामना करावा लागणार होता. पक्षी केव्हाही आणि कोठेही पंखांच्या मदतीने जाऊ शकतात. त्यांना जमिनीवरून, पाण्यातून चालत जावे लागत नाही. ते आकाशात भरारी मारून पाहिजे त्या ठिकाणी पोहोचू शकतात. श्याम सुखस्वप्नात दंग होता. त्याच्या हृदयात प्रेमाचा पूर आला होता म्हणून त्याला वाटले पंख असते तर एकदम उडून गेलो असतो.

## कृतिपत्रिका – ३

**उतारा क्र. ३**

**प्र.१.** (अ) (१) (i) श्यामने आणलेला नवीन कोट बघून त्याच्या आईवडिलांच्या मनात निर्माण झालेले प्रश्न

- **पैसे रे कोठले ?**
- **कोणाचे कर्ज काढलेस ?**
- **का फीचे दवडलेस ?**

(ii) (अ) नवीन कोट (ब) पुरुषोत्तम (क) अण्णा

(२) (i) शिकवण (ii) दृष्टी

(३) श्यामने सांगितलेली हकीकत ऐकून आई शेवटी श्यामबद्दल म्हणाली, 'श्याम, तू वयाने मोठा नाही, पैशाने मोठा नाहीस, शिकून मोठा नाहीस; परंतु मनाने मोठा आजच झालास हो! हेच प्रेम बाळांनो, पुढेही ठेवा. या प्रेमावर कोणाची दृष्टी नको पडायला.



## खेळूया शब्दांशी

**प्र.१.** (अ) थंड × गरम सापडणे × हरवणे सुगंध × दुर्गंध

थोरला × धाकटा जुना × नवीन लक्ष × दुर्लक्ष

स्मृती × विस्मृती

(आ) (१) **शब्द** – त्यांनी. कारण, इतर सर्व नामे आहेत व 'त्यांनी' हे सर्वनाम आहे.

(२) **शब्द :** सातपुते. कारण, इतर सर्वनामे आहेत व 'सातपुते' हे नाम (आडनाव) आहे.

(३) **शब्द :** हिमालय. कारण, इतर विशेषणे आहेत. 'हिमालय' हे विशेषनाम आहे.

(४) **शब्द :** आम्ही. कारण, इतर सर्व क्रियापदे आहेत. 'आम्ही' हे सर्वनाम आहे.

**प्र.२. खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.**

(१) रोजगारी होणे – कामधंद्याला लागणे

**वाक्य :** वडील गेल्यानंतर आपल्या कुटुंबासाठी महेश रोजगारी झाला.

(२) दुथडी भरून वाहणे – पूर्ण भरून वाहणे

**वाक्य :** पूर्णा नदीला पूर आल्यामुळे ती दुथडी भरून वाहत होती.

(३) निश्चय करणे – निर्धार करणे

**वाक्य :** सहामाही परीक्षेत चांगले टक्के मिळवण्याचा सुहासने निर्धार केला.

### क्रियाविशेषण अव्यय

**प्र.१.** (१) पूर्वी (२) नेहमी

**प्र.२.** (१) सभोवार (२) पलीकडे

प्र.३. (१) पटापट (२) हळू

प्र.४. (१) भरपूर (२) अतिशय

प्र.५.

| कालवाचक क्रियाविशेषण अव्यये | स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये | रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये | परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये |
|---|---|---|---|
| परवा, दररोज, क्षणोक्षणी | समोरून, वर, तिथे, पलीकडे | कसे, सतत, झटकन, टपटप, सावकाश | जरा, थोडा, अतिशय, पूर्ण, मुळीच |

## ३. माझ्या अंगणात

### स्वाध्याय

प्र.१. (अ) कवीच्या अंगणात गव्हाची आणि ज्वारीची रास पडते.

(आ) रानमेवा कवीच्या अंगणात उगवला आहे.

(इ) एकमेकांना देत-घेत, एकत्र बसून आपण रानमेवा खाल्ला तर आपल्यातील प्रेम, वात्सल्य, बंधुभावाची भावना वाढीस लागते. आपसातील मतभेद विसरून सर्वजण आनंदाने राहतात, म्हणून कवी रानमेवा गुण्यागोविंदाने खायला सांगत आहे.

(ई) कवीच्या अंगणात दाणे टिपण्यासाठी पाखरे येतात.

प्र.२. (अ) गहू शाळवाचं मोती
काळ्या रानात सांडलं.

(आ) काळ्याशार मातीतुनी
मोती-पवळ्याची रास.

(इ) जीव दमतो, शिणतो
घास भरवते माय.

(ई) दिला-घेतला वाढतो रानातला रानमेवा,
तुम्ही आम्ही सारेजण गुण्यागोविंदानं खावा.



### कृतिपत्रिका

प्र.१. (अ) (१) गहू – अंगणात पडणाऱ्या राशी – ज्वारी

(२) (i) दिल्या घेतल्याने

(ii) काळ्याशार मातीतून

(३) रानमेवा म्हणजे दऱ्या-डोंगराच्या रानातली आंबट, तुरट, गोड अशा प्रकारची फळे. ती खाल्ल्यानंतर जिभेवर रेंगाळणाऱ्या चवीमुळे कुठेतरी अनोखी तृप्ती मनाला लाभते.

सर्वसाधारणपणे रानमेव्यात करवंदे, जांभळे, चिंचा, बोरे, आळू, तोरणं, मलबेरी / तुती इ. स्थानपरत्वे यात एखाद दुसऱ्या फळांची भर पडते. आडरानात असलेली, ठराविक मोसमातली फळे रानमेव्यात येतात.

डोंगरची काळी मैना उर्फ करवंदे, गावठी बोरे, जांभळे-यातही रानजांभळे वेगळी. कमी गर असलेली तसेच आळू हे चिक्कूसारखे दिसणारे व आंबट गोड चवीचे फळ, जाम म्हणजे पांढरट व काहीसं पिस्ता रंगाचं फळ, ताडगोळे एक रसदार, उन्हाच्या काहिलीत थंडावा देणारं फळ, रायआवळा हे एकदम छोट्या आकाराचे आवळे, रानातला हा रानमेवा गुणांच्या बाबतीतही श्रेष्ठ. चवही एकदा खाल्ल्यावर जीभेवर रेंगाळणारी. आंबट-तुरट गोड चव असणारा रानमेवा आरोग्यासाठी खूपच उत्तम असतो. रानावनातल्या निसर्गातलं हे फळाचं वैभव लक्षणीय असे आहे.

(४) दिवाळीच्या सुट्टीत गावाला, मी बाबांबरोबर शेतावर गेलो होतो. हिरवेगार शेत पाहून मला खूप आनंद झाला. मोत्यासारख्या टपोऱ्या दाण्यांनी भरलेली ज्वारीची कणसं वाऱ्यावर डुलत होती. वाऱ्याची झुळूक येताच, समुद्राच्या पाण्याप्रमाणे पिकांवर सुंदर लहरी उमटत होत्या. ताठ मानेने वाऱ्यावर डोलणारी ज्वारीची कणसं खूप गोंडस दिसत होती. निसर्गाचा हा हिरवागार ठेवा पाहून मला खूप आनंद झाला.

(आ) **प्र.१.** ज्ञानेश्वर कोळी

**प्र.२.** जीव दमतो, शिणतो घास भरवते माय,
घरामंदी घरट्यात जशी दुधातली साय

**प्र.३.** शेतकरी रात्रंदिवस शेतात कष्ट करतो तेव्हा आपल्याला धान्य मिळते. काहीही खाताना एकमेकांना वाटून खावे. वाटून खाल्ल्यामुळे त्या पदार्थांची गोडी वाढते. मनातील सारे रुसवेफुगवे विसरून आनंदाने रहा. हा संदेश या कवितेतून मिळतो.

### खेळूया शब्दांशी

(अ) (१) रास (२) साय (३) गालावर

(आ) (१) मोळी (२) थवा (३) घड
(४) तांडा (५) घोळका (६) घड

(इ) (१) पडलं (२) मिजास (३) साय

(ई) (१) खाऊया (२) आई (३) घरामध्ये (४) अश्रू

### उपक्रम

**प्रश्नावली :**

(१) तुमचे नाव काय?
(२) तुम्ही किती वर्षांपासून शेती करत आहात?
(३) तुमची किती एकर शेती आहे?
(४) तुमच्या शेतात तुम्ही कोणकोणती पिके घेता?
(५) शेतीचे तुम्ही कोणते प्रशिक्षण घेतले आहे?
(६) शेतात तुम्ही कोणत्या खतांचा वापर करता?
(७) तुम्हांला सरकारच्या योजना उपयोगी वाटतात का?
(८) या व्यवसायात तुम्ही आनंदी आहात का?
(९) वर्षभर शेतातून पिके घेण्यासाठी पाण्याची व्यवस्था केली आहे का?



### खेळ खेळूया

★

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | स | | | |
| २ | स | सा | | |
| ३ | स | त | त | |
| ४ | स | र | ब | त |
| ५ | स | ड | क | |
| ६ | स | ण | | |
| ७ | स | | | |

### कविता करूया

**(1)** आला आला गुढीपाडवा
स्वागतयात्रेची तयारी करा ।।1।।
दारी रेखीली रांगोळी
दिव्यांचा सण दिवाळी ।।2।।
करा दुर्गुणांची होळी
आनंदाने खा पुरणपोळी ।।3।।

(2) माझ्या घराभोवती
झाडे झुडुपे किती ।।1।।
रंगीबेरंगी पाने फुले
दारी सुंदर तोरण झुले ।।2।।

## ४. गोपाळचे शौर्य

### स्वाध्याय

**प्र.१.** (अ) नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील मोहदी या खेडेगावापासून आठ ते दहा किलोमीटर अंतरावर कर्णागड वसलेला आहे.

(आ) गडावर लागलेली आग विझविण्यासाठी 'गाडी थांबवा' असे गोपाळ ओरडला.

(इ) वाटेच्या बाजूला असलेल्या शेतातील नदीवरून सुरू असलेला पाण्याचा पाईप गोपाळने ओढून आगीवर पाणी मारण्यास सुरुवात केली.

(ई) आग वेळेवर विझली नसती तर गडावर गेलेले गुराखी व गुरे वाचली नसती. गडावरील आणखी झाडे–झुडपे आगीत जळून खाक झाली असती म्हणजेच गडाचे आणि निसर्गाचेही नुकसान झाले असते.

प्र.२. (अ) असे शिक्षक गोपाळला दरडावून म्हणाले.


(आ) असे गोपाळ गुराख्याला म्हणाला.

(इ) असे शिक्षक दुसऱ्या गाडीतील गृहस्थांना म्हणाले.

**कृतिपत्रिका - १**


**उतारा क्र. १**

**प्र.१.** (अ) (१) (i)




(ii) (अ) मंदाकिनी (ब) कर्णागड

(२) (i)




(ii) (१) तालुका (२) खेडेगाव (३) जिल्हा

(३) निसर्गरम्य ठिकाणे थकल्या भागल्या मनात एक नवी ऊर्जा निर्माण करतात. आमच्या घरच्यांबरोबर नुकताच मी महाबळेश्वरला जाऊन आलो.

महाराष्ट्राच्या पश्चिम घाटाच्या रांगेतील महाबळेश्वर हे थंड हवेचे निसर्गरम्य असे ठिकाण आहे. निसर्गाची नानाविध रूपे महाबळेश्वरच्या परिसरात प्रत्यक्ष जाऊन अनुभवण्यासारखी आहेत.

महाबळेश्वरमधील पंचगंगा मंदिर कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री व गायत्री या पाच नद्यांचे उगमस्थान. वेण्णा तलावातल्या नौकाविहाराची मज्जा काही औरच आहे. महाबळेश्वरमधील विविध देखाव्यांची ठिकाणे-पॉईंट खिळवून ठेवणारे आहेत. ऑर्थर पॉईंटवरून आजुबाजूच्या परिसराचे विहंगम दर्शन व सूर्योदयाचा अनुभव मनात घर करणारा आहे. अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे विविध रंग 'बॉम्बे पाईंट' वर घेता येतात. जवळच असणारी ऐतिहासिक ठिकाणे-प्रतापगड, मकरंदगडालाही जाता येते. महाबळेश्वरच्या



परिसरातील स्ट्रॉबेरी, जांभळाचा मध, लाल मुळा तोंडाला एक वेगळीच चव आणतात. निसर्गाच्या नानाविध रंग रूपाला न्याहाळण्याचे सुख महाबळेश्वरच्या परिसरात प्रत्येकालाच लाभते.

**कृतिपत्रिका - २**

**उतारा क्र. २**

**प्र.१.** (अ) (१) (i)




(ii) घाटाच्या खालच्या बाजूने आग लागली होती. नाहक आपण आगीत सापडू नये या उद्देशाने


(२) (i) चौदा वर्षे (ii) अडीच-तीन इंच परिघ असलेला

(३) दुसऱ्याला मदत करणे हा गोपाळचा गुण मला आवडला. कारण गडावरील आग विझविण्यासाठी गोपाळने स्वत:चा जीव धोक्यात घालून आग विझविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

**कृतिपत्रिका - ३**

**उतारा क्र. ३**

**प्र.१.** (अ) (१) (i)




(ii) (अ) नरखेडहून (ब) गुराखी

(२) (i) गोपाळने

(ii) (अ) असत्य (ब) सत्य

(३) रविवारचा दिवस होता. बाबा भाजी मार्केटमध्ये गेले होते. सकाळी साधारण ११.३० वाजले होते. घरात मी, आई, माझी धाकटी बहीण आम्ही तिघेच होतो. आईने स्वयंपाकघरात गॅसवर कुकर ठेवला होता. मी टी.व्ही पहात होतो. आई स्वयंपाकघरात जेवणाची तयारी करत होती. बहीण तेथेच होती. बराच वेळ कुकरची शिटी होत नव्हती. आई आपल्या कामात मग्न होती. अचानक जोराचा आवाज झाला. म्हणून मी धावत स्वयंपाकघरात गेलो तर कुकरचे झाकण खाली पडले होते. कुकर वरती उडाला होता. कुकरमधील अन्न इकडे तिकडे सांडले होते. मी धावत जाऊन गॅस बंद केला. बहिणीला तेथून दूर केले. आई तर थरथरत होती. आईच्या अंगावर थोडे गरम पाणी पडल्यामुळे भाजले होते. बहीण रडत होती. मी आईला आणि बहिणीला बाहेर घेतले. अशा रीतीने थोडक्यात मोठा अपघात होताना वाचला.

## खेळूया शब्दांशी

(अ)

| क्र. | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| (१) | कर्णागड | | | आहे |
| (२) | ड्रायव्हर, गाडी | | | वाढवला |
| (३) | पाईप, गोपाळ | तो | लांब | आणला |
| (४) | चेहरे | | | होते. |

(आ) (१) प्रत्यक्षदर्शी (२) अकल्पित

(३) पोशिंदा (४) कौतुकास्पद



(इ) गैर → **गैरहजर**, **गैरसोय**, **गैरसमज**

बिन → **बिनपगारी**, **बिनडोक**, **बिनतारी**

परा → **परावलंबी**, **पराकोटी**, **पराकाष्ठा**

(ई) (१) माझे हसणे <u>क्षणोक्षणी</u> वाढतच गेले.

(२) मंदा लिहिताना <u>नेहमी</u> चुका करते.

(३) आईने आशाला <u>शंभरदा</u> बजावले.

(४) सभोवार <u>दाट</u> झाडी होती.

(उ) (१) पूर्वी (२) घटाघटा (३) समोरून (४) सगळीकडे

## चर्चा करा. सांगा.

- आपत्ती म्हणजे संकट. नैसर्गिक रितीने निर्माण झालेल्या आपत्तीला नैसर्गिक आपत्ती असे म्हणतात. उदा. पूर, भूकंप, ज्वालामुखी, वादळ, अतिवृष्टी. मानवाने केलेल्या कृतीमुळे ज्या आपत्ती येतात त्यांना मानवनिर्मित आपत्ती असे म्हणतात. उदा. बॉम्बस्फोट, दंगली, चेंगराचेंगरी, घरगुती अपघात.
- विद्यार्थ्यांनी स्वत: कृती करा.

# ५. दादास पत्र

**स्वाध्याय**

प्र.१. (अ) विज्ञान केंद्रातर्फे शाळेत पक्ष्यांसंबंधीची चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखवली ती पाहून आणि तेव्हा ताई-दादांनी सांगितलेली माहिती ऐकून विद्यार्थ्यांनी अभयारण्यात सहलीला जाण्याचा हट्ट धरला.

(आ) अभयारण्यातून फिरताना सरांनी विद्यार्थ्यांना सांगितले की माळढोक पक्षी शेतकऱ्याचा मित्र आहे, कारण शेतातील किड्यांवर तो गुजराण करतो. हा पक्षी वर्षातून एकदाच अंडी घालत असल्याने त्यांची संख्या कमी आहे. शिवाय इतर प्राण्यांनी या पक्ष्यांची अंडी तुडवली, तर संख्या आणखीच कमी होते.

**कृतिपत्रिका - १**

**उतारा क्र. १**

प्र.१. (अ) (१) (i) माळढोक अभयारण्य

(ii) (अ) शेतकऱ्याचा (आ) एकदाच

(२) (i) माळढोक

(ii) शाळेत पक्ष्यांसंबंधीची चित्रफीत कशातर्फे दाखवली ?

(३) वाढत चाललेल्या तापमानामुळे, वृक्षतोडीमुळे आणि शहरीकरणामुळे पक्ष्यांची संख्या घटत चालली आहे. ही संख्या वाढावी म्हणून मी गच्चीमध्ये, खिडकीत, बाल्कनीत पक्ष्यांसाठी खाद्य आणि त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय करेन. कारण उन्हाळ्यामध्ये पक्ष्यांना पाणी मिळत नाही आणि पाण्यावाचून त्यांना आपले प्राण गमवावे लागतात. फुले व फळे देणारी झाडे लावेन ज्यामुळे पक्ष्यांना अन्न मिळेल. लोकांना सांगेन की प्रत्येकाने किमान एक झाड लावा कारण पक्ष्यांचे आश्रयस्थान असलेली झाडे नष्ट होत आहेत.



**कृतिपत्रिका - २**

**उतारा क्र. २**

प्र.१. (अ) (१) (i) पक्ष्यांची प्रमुख भूमिका → प्रदूषण टाळण्यात; बियांचे वहन करण्यात

(ii) (अ) चंडोल (ब) माळटिटवी (क) माळढोक

(२) (i) असत्य

(ii) पक्ष्यांचे फोटो काढण्यापूर्वी वनखात्याची पूर्वपरवानगी घ्यावी लागते.

(३) पक्षी हा संतुलित पर्यावरणाचा अविभाज्य घटक आहे कारण पर्यावरण संतुलित राखण्यास पक्षी मदत करत असतात. शेतातील पिकांचा नाश करणारे कीटक हे पक्ष्यांचे अन्न आहे. कावळे, निळकंठ यांसारखे पक्षी कीटक व त्यांची अंडी खाऊन कीटकांची संख्या नियंत्रित करण्यास मदत करतात आणि किडींपासून पिकांचे रक्षण होण्यास मदत होते. कोकिळा, मैना, कबुतरे हे पक्षी फळे खातात आणि बिया बऱ्याच ठिकाणी टाकतात. ज्याठिकाणी या बिया पडतात तेथे नवीन झाडांची निर्मिती होते. तसेच पक्षी परागीभवनाचे काम करतात. शेतीची नासाडी करणारे आणि अनेक आजार पसरवणारे उंदीर-घुशी यांना खाण्याचे काम शिकारी पक्षी करतात. उदा. गरुड, घुबड तसेच मोठ्या मोठ्या मेलेल्या प्राण्यांना खाऊन निसर्ग स्वच्छ ठेवण्याचे काम गरुड, गिधाड हे पक्षी करत असतात. म्हणून पर्यावरणामध्ये पक्ष्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**माहिती मिळवूया**

| एकतर्फी माहितीची / संवादाची साधने | दुतर्फी माहितीची / संवादाची साधने |
|---|---|
| फॅक्स, रेडिओ, वर्तमानपत्र, भाषण, ई-मेल, जाहिरात, मोबाईल संदेश, पत्र | आंतरजाल चर्चा, मुलाखत, मोबाईल, संभाषण |

## शब्दकोडे सोडवूया

★

| | | |
|---|---|---|
| थोडासा | अनेक | मोजके |
| जरासा | काही | वर |
| हळू | आज | खाली |
| जिकडे | तिकडे | सावकाश |

## आम्ही सूचनाफलक वाचतो.

(१) ही सूचना २३ सप्टेंबर २०२२ या तारखेला देण्यात आली आहे.

(२) पाणीपुरवठा २४ सप्टेंबर २०२२ रोजी बंद करण्यात येणार आहे.

(३) पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईनच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात येणार आहे म्हणून पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

(४) उपलब्ध पाण्याचा वापर अधिक काटकसरीने व जपून करावा ही सूचना पाण्याच्या वापराबाबत नागरिकांना देण्यात आली आहे.

---

# ६. टप् टप् पडती

## स्वाध्याय

**प्र.१.** (अ) प्राजक्ताची फुले टप् टप् अंगावर पडू लागल्यावर त्या तालावर कवितेतील मुलांचे गाणे जुळून येते.

(आ) भरभर वारा आल्यामुळे गवत खुशीने डोलते.

(इ) मुलांच्या गाण्यातून पाऊस, वारा व मोरपिसारा फुलतो.

(ई) जे गाणे गाणार नाहीत त्यांना खुळे म्हटले आहे.

**प्र.२.** (अ) कुरणावरती, झाडाखाली ऊनसावली विणते जाळी

(आ) हसते धरती, फांदीवरती हा झोपाळा झुले!

(इ) पाऊस,वारा, मोरपिसारा या गाण्यातुन फुले!



## कृतिपत्रिका

**प्र.१.** (अ) (१) (i) गाण्यातून फुलणाऱ्या गोष्टी: **मोरपिसारा**, **वारा**, **पाऊस**

(ii) फांदीवर

(२) (i) ऊनसावली इथे जाळी विणते: **कुरणावरती**, **झाडांखाली**

(ii) गाणे अमुचे झुळझुळ वारा, गाणे अमुचे लुकलुक तारा.

(३) वारा ज्याप्रमाणे झुळझुळ वाहतो, त्याची मंद झुळूक येते. वारा, पाऊस आनंदाने फुलतो, पावसाचे सौंदर्य जसे फुलते. पाऊस आल्यावर मोर आनंदाने नाचतो आणि मोराचा पिसारा जसा फुलतो त्याप्रमाणे कवीच्या मनातील विचार, कल्पना फुलल्या आहेत. त्याला नवनवीन कल्पना सुचल्या आहेत. म्हणजेच कवीच्या मनातील गाणे फुलले आहे.

(४) गुलाबाला 'फुलांचा राजा' म्हणतात. गुलाब अनेक रंगांचे असतात. गुलाबी, पिवळे, सफेद अशा अनेक रंगांचे गुलाब आपल्याला पाहायला मिळतात. 'काश्मिरी गुलाब' सर्वात जास्त प्रसिद्ध आहे. गुलाबाचे फूल सुगंधी असते. म्हणूनच गुलाबाच्या पाकळ्यांचा उपयोग करून सुगंधी असे अत्तर बनवितात. बऱ्याच कार्यक्रमांमध्ये गुलाबाच्या फुलांचा उपयोग करून सजावट करतात. गुलाबाचे फूल स्त्रिया आपल्या केसात माळतात त्यामुळे स्त्रियांच्या केसांची शोभा वाढते. पुष्पगुच्छ बनविण्यासाठी गुलाबाच्या फुलांचा उपयोग करतात. अनेक लोक गुलाबाच्या फुलांची शेती करून आपली उपजीविका करतात. काही लोक फक्त गुलाबाची फुले विकण्याचा व्यवसाय करतात. गुलाबाच्या फुलांपासून सरबत व गुलकंद बनवतात.

गुलाबाचे फूल सुंदर असून ते औषधीसुद्धा आहे. गुलाबापासून बनवलेले गुलाबपाणी डोळ्यात टाकल्यास आराम मिळतो. खरोखरच काटेरी रोपावर फुलणारे हे फूल म्हणजे निसर्गाचा एक चमत्कारच आहे.

(आ) **प्र.१.** मंगेश पाडगांवकर

**प्र.२.** फुलांसारखे सर्व फुला रे सुरात मिसळुनि सूर, चला रे
गाणे गाती तेच शहाणे, बाकी सारे खुळे!

**प्र.३.** निसर्गातील प्रत्येक गोष्टीचा आनंद घ्या. फुलांप्रमाणे सर्वांनी आनंदी रहा, प्रसन्न रहा. एकमेकांसोबत रहा आणि जीवनाचा आनंद लुटा.'

### खेळूया शब्दांशी

**प्र.४.** (अ) भिर् भिर्, झुळझुळ

(आ) हसरी – धरती झुळझुळ – वारा
लुकलुक – तारा फांदी – झोपाळा

(इ) (१) **कुरणावरती :** वर, तीर, कुणावर, रती
(२) **झाडाखाली :** खाली, झाली, खाडा, झाडा
(३) **ऊनसावली :**ऊन, सावली, साव, लीन, साली, नऊ, वसा, वन

(ई) **उदा.** बरे × वाईट शुभ × अशुभ
आनंद × दु:ख यश × अपयश
नफा × तोटा चढ × उतार
लहान × मोठे आत × बाहेर



**खेळ खेळूया**

★

शाळा
शाळा आहे.
नागपूरला शाळा आहे.
नागपूरला चौकात शाळा आहे.
नागपूरला चौकात मध्यभागी शाळा आहे.
नागपूरला चौकात मध्यभागी मोठी शाळा आहे.
नागपूरला चौकात मध्यभागी नवजीवन मोठी शाळा आहे.

---

## ७. आजारी पडण्याचा प्रयोग

### स्वाध्याय

**प्र.१.** (अ) पाठातील मुलाच्या घरातील आजारी माणसे संत्री, मोसंबी, सफरचंद, खडीसाखर, बेदाणा, पेढे, गोड औषधे, शिरा हे पदार्थ 'औषध' म्हणून घेत असत. हा मुलगा कधीही आजारी पडत नसे म्हणून या पदार्थांना हात लावायची त्याला सक्त मनाई असे. तेव्हा ही औषधे आपणही बरोबरीने घ्यावीत व त्यांच्या दु:खात सहभागी व्हावे असे वाटू लागले.

(आ) घरातील सर्व मंडळी स्वत:च इतक्या वेळा आजारी पडत होती पण मुलाच्या वाटणीला कोणतेच आजारपण येत नव्हते, तेव्हा मुलाने डॉक्टरांकडून औषध आणायचेच, असे ठरवले.

(इ) डॉक्टरांनी मुलाला तपासले. इकडे, तिकडे, पालथे वळायला सांगितले. गळ्यातली नळी छातीवर लावली, जीभ बघितली, तेव्हा मुलाला धन्य धन्य झाल्यासारखे वाटले.

(ई) "तुझी तब्येत ठणठणीत आहे, तेव्हा औषध काही नाही. पळ घरी जा." असे डॉक्टरांचे बोलणे ऐकून मुलाची निराशा झाली.

**कृतिपत्रिका - १**

**उतारा क्र. १**

**प्र.१.** (अ) (१) (i) मुलाच्या मते

- मोठी दुखणी
  - **टायफॉइड**
  - **क्षय**
  - **न्यूमोनिया**
- छोटी दुखणी
  - **थंडीताप**
  - **खोकला**
  - **पडसे**

(ii) आपण आजारी पडत नाही याचे

(२) (i) मुलाच्या घरातील आजारी व्यक्तींची औषधे

- **संत्री**
- **गोड औषधे**
- **खडीसाखर**
- **पेढे**
- **बेदाणा**
- **सफरचंद**
- **मोसंबी**

(ii) (अ)आई - खोकला (ब) बाबा - पडसे

(क) दादा - अंगदुखी (ड) ताई - हातदुखी

(३) घरातील एखादी व्यक्ती आजारी पडल्यास मी त्यांच्या सेवेसाठी सदैव हजर असेन. त्यांना औषधे, खाणे-पिणे वेळच्या वेळी देईन. त्यांना वर्तमानपत्र किंवा आवडीची पुस्तके वाचून दाखवेन. त्यांच्याशी गप्पा मारेन. त्यांचे मनोरंजन होईल याकडे लक्ष देईन.

**कृतिपत्रिका - २**

**उतारा क्र. २**

**प्र.१.** (अ) (१) (i) (अ) मुलगा

(ब) डॉक्टरांनी जेव्हा मुलाच्या पोटावर एकदम टिचकी मारली.



(ii) (अ) छातीवर

(ब) नाखुशीने

(२) (i) "तुम्हांला ऑपरेशन करता येतं का हो डॉक्टर ?"

(ii) मुलगा पळत पळत घरी जाऊन सगळ्यांना ऑपरेशन दाखवणार होता.

(३)

| आपण आजारी असताना काय करू शकत नाही ? | आपण आजारी नसताना काय करू शकतो ? |
|---|---|
| खेळायला जाऊ शकत नाही. | जेवढे हवे तेवढे खेळायला मिळते. |
| बाहेर फिरायला जाता येत नाही. | बाहेर मित्रांबरोबर फिरायला जाऊ शकतो. |
| आपल्याला हवे असलेले पदार्थ खाता येत नाहीत. | आपल्या आवडीचे पदार्थ खाता येतात. |

**चर्चा करा. सांगा.**

(१) चोरावर मोर : **वरचढ होणे**

**वाक्य :** नवीन आलेला संजय सर्व कलाकारांमध्ये **चोरावर मोर** ठरला.

(२) छत्तीसचा आकडा : **वैर, विरोध**

**वाक्य :** साप आणि मुंगूस यांचा नेहमी **छत्तीसचा आकडा** असतो.

(३) जमदग्नीचा अवतार: **अतिशय रागीट मनुष्य**

**वाक्य :** आमचे काका म्हणजे **जमदग्नीचा अवतार.**

(४) इतिश्री: **शेवट**

**वाक्य :** पसायदानाने कार्यक्रमाची **इतिश्री** झाली.

(५) लंकेची पार्वती : **अंगावर दागिने नसलेली स्त्री.**

**वाक्य :** सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्याची पत्नी **लंकेची पार्वती** झाली.

(६) कळीचा नारद : **भांडणे लावणारा**

**वाक्य :** विजय वर्गात नेहमी **कळीच्या नारदाची** भूमिका करतो.

(७) घागरगडचा सुभेदार : **पाणक्या (जमिनीतील पाण्याचा साठा शोधणारा)**

**वाक्य :** सदूभाऊ संपूर्ण जिल्ह्यात **घागरगडचा सुभेदार** म्हणून ओळखले जातात.

(८) उंटावरचा शहाणा : **मूर्खपणाचा सल्ला देणारा**

**वाक्य :** पावसाळ्यात घराचे छप्पर गळू लागले म्हणून एका उंटावरच्या शहाण्याने नवीन घर बांधण्याचा सल्ला दिला.

(९) गळ्यातला ताईत : **अतिशय प्रिय**

**वाक्य :** शाळेत सर्व स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकविणारा गौरांग शिक्षकांच्या गळ्यातला ताईत झाला आहे.

## खेळूया शब्दांशी

(अ) (१) डॉक्टर : वैद्य (२) ऑपरेशन : शस्त्रक्रिया

(३) मेडिसीन : औषध (४) पेशंट : रुग्ण

(आ) (१) टवटवीत फूल (२) चमचमीत जेवण (३) ठणठणीत आरोग्य

(४) बटबटीत डोळे (५) मिळमिळीत भाजी (६) गुळगुळीत दगड

(इ) (१) हॉस्पिटलमध्ये (इस्पितळात) **औषधांचा** भरपूर साठा होता.

(२) सरकारी डॉक्टरांच्या **औषधांवर** आजीचा खूप विश्वास.

(३) बाबांनी **औषधांच्या** नवीन बाटल्या आणल्या.



(४) हळद आणि मध हे खोकल्यावर रामबाण **औषध.**

(५) डॉक्टरांचे कपाट **औषधांनी** भरलेले होते.

(६) **औषधांना** आजकाल खूप मागणी असते.

(७) जुन्या **औषधांतून** प्राण्यांना विषबाधा झाली.

(८) काकूला आयुर्वेदिक **औषधांपासून** चांगला आराम पडला.

(ई) (१) सुलेमानचाचा रोज सकाळी फिरायला जातात, त्यामुळे त्यांची **तब्येत ठणठणीत असते.**

(२) ध्वनिक्षेपकाच्या आवाजामुळे घरात आजोबांना काही **सुचेनासे झाले.**

(३) जॉन आज शाळेत नवीन कंपास घेऊन आला होता. वर्गातील सर्व मुलांना दाखवत तो खूप **फुशारकी मारत** होता.

(४) तो रस्ता खासगी असल्यामुळे आपले वाहन तेथून नेण्याला **सक्त मनाई आहे.**

## संदेश तयार करूया.

कृपया शांतता राखा.

येथे थुंकू नये.
स्वच्छता राखा.

## शब्दयोगी अव्यये

★ (१) आमच्या शाळे<u>समोर</u> वडाचे झाड आहे.

(२) मुलांनी फुगेवाल्या<u>भोवती</u> गर्दी केली.

(३) आमचा कुत्रा मला नेहमी मित्रा<u>प्रमाणे</u> भासतो.

(४) देशाला देण्यासाठी तुमच्या<u>कडे</u> दहा मिनिटे वेळ आहे का ?

**प्र.१.** (१) समोर (२) भोवती (३) प्रमाणे (४) वर (५) बाहेर

(६) पेक्षा (७) कडे

आपली समस्या आपले उपाय – १

## विचार करा. सांगा.

(१) शहराच्या सांडपाण्यामुळे, रासायनिक खतांचा वापर केलेल्या शेत जमिनीतून झिरपणाऱ्या पाण्यातील किंवा कारखान्याच्या सांडपाण्यातील नायट्रोजन व फॉस्फरस ही द्रव्ये पाण्यात मिसळल्याने आणि माणसांच्या वाईट सवयींमुळे नदीचे पाणी प्रदूषित होते.

(२) जलपर्णी उगवल्याने पाणी प्रदूषित होते.

(३) नदीचे पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून पुढील उपाय करता येतील. (i) प्रक्रिया करूनच नदीत सांडपाणी सोडले पाहिजे. (ii) नदीत निर्माल्य, कचरा टाकू नये. (iii) माणसाने आपल्या वाईट सवयी सोडून दिल्या पाहिजेत **उदा.** नदीकाठी कपडे–गुरे धुणे, शौचास बसणे, नदीत आंघोळ करणे. (iv) नदीतील गाळ उपसला पाहिजे.

(४) नदीत सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यातील नायट्रोजन व फॉस्फरस या द्रव्यांवर प्रक्रिया केली पाहिजे. नायट्रोजन व फॉस्फरस ही द्रव्ये असलेले पाणी नदीत सोडू नये.

### आम्ही जाहिरात वाचतो.

(१) ही जाहिरात पुस्तक प्रदर्शनासंदर्भात आहे.



(२) १५ ते २० ऑक्टोबर २०२२

(३) पुस्तक प्रदर्शनाची वैशिष्ट्ये – (i) छोट्यांसाठी व मोठ्यांसाठी स्वतंत्र दालन (ii) नामवंत साहित्यिकांची पुस्तके (iii) विविध विषयांवरील पुस्तके (iv) मुलांसाठी आवडत्या गोष्टींची, प्रयोगांची, कोड्यांची आणि कृतींची पुस्तके (v) सायंकाळी ७ ते ८ या वेळेत नामवंत साहित्यिक आपल्या भेटीला व प्रत्यक्ष वार्तालाप करण्याची संधी.

(४) शारदा विद्यालयाचे सभागृह येथे प्रदर्शन भरणार आहे.

(५) शंभर रुपयांच्या खरेदीवर वीस रुपयांची सवलत मिळणार आहे.

(६) आम्ही पुस्तक प्रदर्शनात गोष्टींची, प्रयोगांची, कोड्यांची, कृतींची पुस्तके खरेदी करू.

## ओळखा पाहू!

(१) खुर्ची (२) टेबल (३) कंगवा (४) सुई (५) ब्रश

## ओळखा पाहू!

(अ) सूर्य (आ) पोपट (इ) मोबाईल (ई) चेंडू

(उ) टि.व्ही. (ऊ) लिंबू (ए) चंद्र (ऐ) झाड

# भाग - दोन

## ८. शब्दांचे घर

### स्वाध्याय

**प्र.१.** (अ) स्वर (आ) गाणे (इ) काना - मात्रा - वेलांटी

**प्र.२.** (१) घरात होता, **काना - मात्रा वेलांटीचा मेळ**
**एकोप्याने खेळायाचे सगळे** अक्षर - खेळ.

(२) एखाद्याची **धुसफुससुद्धा हवीहवीशी छान**
**प्रत्येकाला अर्थ वेगळा सुखदुःखाचे** भान.

(३) कानोकानी **कुजबुजताना अंकुर मनकोवळा**
**वाट मोकळी होऊन लागे** कवितेचाही लळा.

### कृतिपत्रिका

**प्र.१. (अ)** (१) (i)

शब्दांच्या घरात राहणारे सदस्य : **विरामचिन्हे**, **स्वर**, **काना**, **वेलांटी**, **मात्रा**

(ii) रेघांचे

(२) (i) विरामचिन्हांची (ii) शब्दांच्या घरात

(३) वेलांटी, काना, मात्रा सगळे घरात एकोप्याने राहायचे आणि अक्षर खेळ खेळायचे.

(४) भाषेमुळे एकमेकांशी संवाद साधला जातो. भाषेमुळे आपण अनेक जणांशी मैत्री करू शकतो. भाषेमुळे विचार करण्याची क्षमता वाढते. समूहात रहाण्यासाठी भाषेचा उपयोग होतो. आपल्या मनातील भावना, विचार, कल्पना, अनुभव आपल्याला भाषेमुळे व्यक्त करता येतात. भाषेमुळे आपण आपल्या मनातील आनंद, द्वेष दुसऱ्यापर्यंत सहजपणे पोहोचवू शकतो.



भाषेमुळे आपला शब्दसंग्रह वाढतो. ज्ञान वाढते. भाषेमुळे व्यवहारातील कामे सुलभ होण्यास मदत होते. भाषेमुळे आपण बोलणे, वाचणे, लिहिणे व आकलन करणे ही कौशल्ये विकसित करू शकतो.

**(आ)** प्र.१. कल्याण इनामदार

प्र.२. घरात होता, काना-मात्रा-वेलांटीचा मेळ
एकोप्याने खेळायाचे सगळे अक्षर-खेळ

प्र.३. घरात काना, मात्रा, वेलांटी एकत्र रहायचे आणि सर्वजण मिळून आनंदाने अक्षरांचा खेळ खेळायचे. अशी सुंदर कल्पना या ओळींमध्ये मांडलेली आहे. काना, मात्रा, वेलांटी लावल्याने अक्षर, शब्द तयार होतो. शब्दांच्या घरात हे सारे एकत्र रहातात ही कल्पना मजेशीर वाटल्याने या ओळी आवडल्या.

प्र.४. एकमेकांशी न भांडता सर्वांनी एकोप्याने, गुण्यागोविंदाने राहावे.

### खेळूया शब्दांशी

(अ) (१) धुसफुस (२) अंकुर (३) कानोकानी

(आ) (१) सुंदर (२) हळवे (३) मनकोवळा (४) मोकळी

(इ) नजर → रचना → नाच → चमचा → चाफा

### खेळ खेळूया

(आ) (स) : सण → **सारणी** → **सिमरन** → सीता → **सुगरण** → सूप

**सेवा** → **सैल** → सोने → **सौरभ** → संगत

### शब्दकोडे सोडवूया

* (१) नंतर (२) नजीक (३) समोर (४) वर
(५) प्रमाणे (६) साठी (७) सकट (८) खाली
(९) पुढे (१०) सह (११) मागे

**वाचा**

मुलांनो, शाळेत तुम्हांला अनेक मित्र असतात. तुमची काळजी घेणारे, तुमचे आरोग्य जपणारे असे अनेक मित्र तुमच्या सभोवती आहेत. कोण बरे आहेत हे मित्र? असा प्रश्न तुम्हांला निश्चितच पडेल. आपल्याला फळे, फुले सावली देणारे वृक्ष; आपल्याला पिण्यासाठी पाणी देणाऱ्या नद्या, श्वसनासाठी ऑक्सिजन देणारी हवा, आपण ज्यावर निवांतपणे राहतो अशी जमीन अर्थातच आपल्या सभोवतालचा निसर्ग हाच आपला खरा मित्र आहे.

**प्रकल्प :** विद्यार्थ्यांनी स्वत: करा.

---

# ९. वाचनाचे वेड

## स्वाध्याय

**प्र.१.** (अ) सोनालीने आपल्या अभ्यासाशिवाय दररोज किमान दोन पाने अवांतर वाचावीत. तिला वाचनाची आवड लागावी असे सोनालीच्या आईला वाटत होते.

(आ) कथांचा सारांश लिहून काढण्यासाठी सोनालीने पुन्हा एकदा पुस्तक वाचते असे आईला सांगितले. तिला लागलेली ही वाचनाची गोडी पाहून घरातील सर्वांना नवल वाटत होते.

(इ) सोनालीला प्रोत्साहन देण्यासाठी तिच्या बाबांनी वाढदिवसाला एक छानसे पुस्तक तिला भेट दिले आणि सोबत तिच्या वर्गातील साऱ्याच मुलामुलींना एकेक पुस्तक भेट स्वरूपात दिले.

**प्र.२.** (अ) सोनालीला अवांतर वाचनासाठी प्रवृत्त करण्याकरिता आईला यश येत नव्हते. एका शाळेत पाहुणी म्हणून गेल्यावर तेथील मुलांना सांगण्यासाठी, एक गोष्ट सोनालीने पुस्तकातून निवडून द्यावी,यासाठी आईने सोनालीच्या हातात एक गोष्टीचे पुस्तक दिले.

(आ) आईने दिलेल्या पुस्तकातील सर्वच कथा सोनालीला आवडल्या पण त्यातली कोणती निवडावी ते तिला समजेना म्हणून आईने वाचलेल्या सर्व कथांचा सारांश सोनालीला लिहायला सांगितला.

(इ) शाळेत गेल्यावर सोनालीने बाईंना आपण आईला काय आणि कशी मदत केली ते सांगितले, सोबत एक कथाही ऐकवली. बाईंनी प्रथम



आईला मदत केली म्हणून तिचे अभिनंदन केले व वर्गात छान गोष्ट सांगितली म्हणून कौतुकाने शाबासकी दिली. सोनालीला खूप आनंद झाला आणि तिने वेगवेगळी पुस्तके वाचून त्यातील आवडलेले प्रसंग व ओळी लिहून ठेवण्याचे ठरवले म्हणून आता तिला पुस्तके वाचत जा असे सांगण्याची गरज उरली नाही.

**प्र.३.** मुलांचे अवांतर वाचनाव्यतिरिक्त मैत्री असणारे घटक : **टी.व्ही.**, **व्हिडिओ**, **कॉम्प्युटर**, **मोबाइल**

## कृतिपत्रिका – १

**उतारा क्र. १**

**प्र.१.** (अ) (१)(i) वाचनाचे वेड असणाऱ्या व्यक्ती : **सोनालीची आई**, **सोनालीचा मोठा भाऊ**

(ii) (अ) वाचन (ब) घर

(२)(i) (अ) आनंद (ब) गोष्टीचे पुस्तक

(ii) सोनालीला अवांतर वाचनासाठी प्रवृत्त करण्याकरिता आईला यश येत नव्हते.

(३) प्रत्येकाला आयुष्यात वेगवेगळे छंद असतात. छंद म्हणजे जोपासलेली आवड. प्रत्येकजण आपल्या मोकळ्या वेळेत आपला छंद जोपासत असतो. वाचन, गायन, नृत्य, चित्रकला असे अनेक छंद मुले जोपासतात. माझा आवडता छंद आहे सायकल चालवणे. खरे तर माझ्या बाबांनी मी चौथीत होतो तेव्हा उंची वाढण्यासाठी मला सायकल आणली होती. बाबांनी सायकल चालवायला शिकवली. नंतर मात्र सायकल चालवणे हा माझा छंद कधी झाला ते समजलेच नाही. मला जेव्हा जेव्हा वेळ मिळतो तेव्हा मी सायकल चालवण्याचा आनंद घेतो. सायकल चालवताना माझ्यात एक वेगळाच उत्साह संचारतो. एक वेगळीच ऊर्जा व आनंद मला त्यातून मिळतो. शिवाय व्यायामही होतो. सायकलसाठी कोणतेही इंधन लागत नाही. सायकल चालवल्याने माझे मन प्रसन्न व प्रफुल्लित असते.

सायकल ही माझा आरोग्यदायी मित्र बनला आहे. मी तिची खूप काळजी घेतो. असा हा मला निरोगी ठेवणारा छंद मी कायमच जोपासणार आहे.

## कृतिपत्रिका - २

**उतारा क्र. २**

**प्र.१.** (अ) (१) (i) सोनालीला पुस्तक वाचताना पाहून नवल वाटणारे

**आजी** **आजोबा** **बाबा** **दादा** **काका** **काकू**

(ii) (अ) एक-दीड तास (ब) दहा

(२) (i) सोनालीला उत्सुकता वाटणाऱ्या गोष्टी

**पुढची कथा काय आहे** **पुढच्या कथेत काय लिहिले आहे.**

(ii) सारांश

(३) फक्त अभ्यास एके अभ्यास करायचा मला कंटाळा येतो. शाळेत होणाऱ्या प्रत्येक स्पर्धेत - उपक्रमात भाग घ्यायला मला आवडतो. चित्रकला स्पर्धेत चित्र काढायला आवडतात. खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन मित्रांना हरवायला खूप मजा येते. खेळायला गेल्यावर खूप ताजेतवाने वाटते. स्नायूंचा खूप व्यायाम होतो. भूक चांगली लागते आणि झोपही पटकन लागते. शाळेत होणाऱ्या वक्तृत्वस्पर्धेतही भाग घ्यायला आवडतो. व्यासपीठावर उभे राहून सर्वांसमोर आपले विचार मांडताना माझा ऊर अभिमानाने भरून येतो. अशाप्रकारे सगळीकडे सहभागी होणे मला आवडते.



## कृतिपत्रिका - ३

**उतारा क्र. ३**

**प्र.१.** (अ) (१) (i) **घरातल्या** ← सोनालीने येथील पुस्तकांचे वाचन करायचे ठरवले → **शाळेच्या वाचनालयातल्या**

(ii) आईने सोनालीचे घरातल्या साऱ्यांपुढे कौतुक केल्यामुळे सोनालीचा आनंद गगनात मावत नव्हता.

(२) (i) सोनाली वहीमध्ये लिहून ठेवत असे त्या गोष्टी → **आवडलेल्या ओळी**, **एखादा प्रसंग**

(ii) आईने

(३) सहामाही परीक्षा संपल्या होत्या. दिवाळीची सुट्टी होती. आमच्या परिसरातच बालविद्या भवन म्हणून संस्था आहे. तेथे सुट्टीमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. मी आणि माझ्या मित्राने तेथे सुलेखन वर्गामध्ये प्रवेश घेतला होता. सुलेखन म्हणजे सुंदर हस्ताक्षराची कला. आमचे हस्ताक्षर सुधारावे, अक्षरांना सुंदर वळण लागावे, अक्षर सुस्पष्ट असावे, म्हणूनच आम्ही या उपक्रमात भाग घेतला होता. आम्हाला तेथे अक्षरांची उंची, पसरटपणा, गोल, वाटोळे, चौकोनी इ. आकार, वळण इ. गोष्टींमध्ये विविधता आणून सुलेखनात सौंदर्य कसे आणता येते हे शिकवले गेले. सुलेखन हे आपले आंतरिक प्रतिबिंब असते असे म्हणतात. त्यातून आपले व्यक्तिमत्त्व दिसते. पुढील अभ्यासक्रमासाठी आणि भावी आयुष्यात आम्हाला त्याचा उपयोग होईल म्हणून आम्ही हा वेगळा उपक्रम केला. त्यातून आम्हाला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या.

## खेळूया शब्दांशी

(अ) (१) यशस्वी होणे (२) लिहून ठेवणे.

(३) खूप आनंद होणे. (४) आश्चर्य वाटणे.

(आ) (i) आमूलाग्र - वाक्य : 'श्यामची आई' हे पुस्तक वाचल्यावर, लीनाच्या वर्तनात आमूलाग्र बदल झाला.

(ii) शाबासकी – वाक्य : सुंदर चित्र काढल्यावर मिनूला बाईंनी शाबासकी दिली.

(iii) अवांतर – वाक्य : अवांतर वाचनामुळे आपले ज्ञान वाढते.

(इ) (१) पारितोषिक (२) विजय (३) कथा
(४) साहाय्य (५) रस

(ई) विद्यार्थ्यांनी स्वत: करा.

## आपण समजून घेऊया

(उ) **आई :** आपल्याकडे पाहुणे येणार आहेत, <u>म्हणून</u> आपण पुरणपोळी करूया.

**अंकुश :** आई, तू बटाट्याची भाजी <u>अन्</u> पुऱ्या कर म्हणजे मी तुला मदत करू शकेन, शिवाय स्वयंपाकही लवकर होईल. <u>जर</u> पाहुणे लवकर आले, <u>तर</u> त्यांना वेळेवर जेवायला मिळेल; <u>पण</u> पाहुण्यांना आवडेल <u>ना</u> आपण केलेला स्वयंपाक ?

## आम्ही बातमी वाचतो.

(१) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो.

(२) वरील बातमी १६ ऑक्टोबरची आहे.

(३) वाचन प्रेरणा दिनाची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. परिसरातील महत्त्वाच्या चौकांत 'वाचन संस्कृती वाचवा' या विषयावर मुलांनी पथनाट्ये सादर केली. 'उत्कृष्ट वाचन' ही स्पर्धा घेण्यात आली. अशा प्रकारे वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

(४) इयत्ता सातवीतील शेखर काजळे या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले.

(५) विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्य वाढावे यासाठी शाळेत पुढील उपक्रम घेता येतील.

(अ) विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी पुस्तके सहज उपलब्ध करून दिली पाहिजेत.

(आ) जास्त पुस्तके वाचणाऱ्या मुलांना वर्षाअखेर बक्षीस द्यावे.



(इ) पुस्तक प्रदर्शन भरवावे.

(ई) लेखक –कवी यांच्याशी गप्पा मारण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी.

# १०. पंडिता रमाबाई

## स्वाध्याय

**प्र.१. (अ)** 'मला भारतातील सर्व स्त्रिया सारख्याच आहेत. जेथपर्यंत माझ्या शरीरात रक्ताचा एक बिंदुमात्र आहे, तेथपर्यंत आपल्या स्त्री–जातीचे कल्याण व सुधारणा करण्याच्या कामापासून मी पराङ्मुख होणार नाही. स्त्री जातीची सुधारणा करण्याचे व्रत मी धारण केले आहे.' या त्यांच्या उद्गारांवरून त्यांना स्त्री जातीविषयी अपार प्रेम होते हे समजते.

**(आ)** अडीच हजार लोक बसू शकतील असे प्रार्थनामंदिर बांधताना रमाबाईंनी त्याचा आराखडा स्वत:च तयार केला आणि डोक्यावर विटांचे घमेले वाहून बांधकामाला हातभारही लावला. या प्रसंगातून पंडिता रमाबाई कष्टाळू व काटकसरी होत्या हे जाणवते.

**प्र.२.** (अ) बिपिनबिहारी मेधावी (आ) मनोरमा
(इ) ब्रेल लिपी (ई) पंडिता रमाबाई

**प्र.३.** सहस्रकातील एकमेव कर्मयोगिनी व सत्शील साध्वी, सूर्यकन्या ही विशेषणे पंडिता रमाबाईंसाठी पाठात आलेली आहेत.

## कृतिपत्रिका – १

**उतारा क्र. १.**

**प्र.१.** (अ) (१) (i) स्त्रियांची पहिली सभा भरवली → कोठे → **कोलकाता शहरात**; कोणी → **देशभक्त आनंद मोहन**

(ii) पंडिता रमाबाईंना त्या वेळी बंगाली भाषा येत नव्हती म्हणून त्यांनी स्त्रियांच्या पहिल्या सभेत संस्कृतमध्ये भाषण केले.

(२) (i) स्त्री सभेची वैशिष्ट्ये

| स्त्रियांची पहिली सभा | पहिली स्त्री वक्ता | पहिलाच मौखिक अनुवाद |
|---|---|---|

(ii) बावीस वर्षे

(३) महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म १८२७ रोजी पुण्यात झाला. महात्मा फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. स्त्रियांना बाजूला करून समाजसुधारणा होणे शक्य नाही हे जाणून त्यांनी स्त्रियांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने ऑगस्ट १९४८ मध्ये खास मुलींसाठी पुण्यामध्ये पहिली शाळा सुरू केली. आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षक म्हणून नेमले. त्या काळच्या लोकांना ही गोष्ट पटली नाही म्हणून त्यांनी ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांना त्रास दिला पण महात्मा फुलेंनी माघार घेतली नाही. त्या काळी स्त्रियांना उपेक्षितांचे जीवन जगावे लागे. त्यांना पुरुषांप्रमाणे सन्मानाने जगता यावे म्हणून विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. बालहत्या प्रतिबंधगृह उघडले. विधवांना खास करून संकटात सापडलेल्या विधवांना महात्मा ज्योतिबा फुले यांची मोलाची साथ मिळाली होती. स्त्रियांच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य अद्वितीय असेच आहे.

## कृतिपत्रिका – २

**उतारा क्र. २.**

**प्र.१.** (अ) (१) (i) न्यायमूर्ती रानडे यांचे घर

(ii) व्याख्यानाला येणाऱ्याने आपल्यासोबत घरातल्या एका स्त्रीला आणल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही अशी अट घातलेली असे.



(२) (i) काशीबाई कानिटकर (ii) पुण्यात

(३) स्त्रियांनी शिकले व शिकवले पाहिजे, त्यासाठी आपल्या मातृभाषेचे अचूक ज्ञान प्राप्त केले पाहिजे. शिक्षिका म्हणून उभ्या राहण्यासाठी स्त्रियांना प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्त्या दिल्या पाहिजेत अशी शिफारस पंडिता रमाबाईंनी हंटर कमिशनकडे केली.

## कृतिपत्रिका – ३

**उतारा क्र. ३.**

**प्र.१.** (अ) (१) (i) या स्त्रियांसाठी कार्य करण्याचा रमाबाईंचा निश्चय

| अनाथ | अपंग | विधवा |
|---|---|---|

(ii) स्त्री जातीची सुधारणा

(२) (i) पंडिता रमाबाईंनी येथील पुढारी व धनवानांना आपला निश्चय कळवला

| पुणे | मुंबई | अहमदाबाद |
|---|---|---|

(ii) गृहस्थाने दहा हजार रुपये देऊन त्या रकमेत रमाबाईंनी त्यांचे चाळीस हजार रुपयांत होणारे काम करून दाखवावे अशी अट घातली.

(३) पंडिता रमाबाई यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी कर्नाटक येथे झाला. आईवडिलांच्या मृत्यूनंतर त्या कोलकातामध्ये आल्या. भारतातील कोलकाता शहरात भरलेल्या स्त्रियांच्या पहिल्या सभेत बंगाली भाषा येत नव्हती म्हणून त्यांनी संस्कृतमध्ये भाषण केले. अतिशय विद्वान वकील म्हणून प्रसिद्ध असलेल्या बिपिनबिहारी मेधावी यांच्याशी त्यांनी वयाच्या २२ व्या वर्षी लग्न केले. पतीच्या निधनानंतर त्या आपल्या मुलीला घेऊन पुण्यात आल्या. तेथे त्यांनी अनेक व्याख्याने दिली. स्त्रियांनी शिकले पाहिजे. त्यांनी मातृभाषेचे ज्ञान मिळवले पाहिजे. शिक्षिका होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन

देण्यासाठी शिष्यवृत्त्या मिळाल्या पाहिजेत म्हणून हंटर कमिशनकडे मागणी केली. स्त्री-जातीची सुधारणा करण्याचे व्रत त्यांनी घेतले होते. स्त्री-जातीविषयी अपार प्रेम आणि त्यांचे दु:ख दूर करण्याची त्यांना तळमळ होती. पंडिता रमाबाईंनी मुक्तिमिशनची स्थापना केली. तेथे मुलींना स्वावलंबी करण्याच्या हेतूने वेताच्या खुर्च्या विणणे, मोजे विणणे, भांड्यांना कल्हई करणे, चित्रे छापणे, दवाखाना चालवणे, घाण्यावर तेल काढणे असे अनेक उद्योग सुरू केले. त्या काळी ही आश्चर्याची गोष्ट होती. कोणतेही काम करताना त्यांनी कधीच कमीपणा मानला नाही. रमाबाईंचे आयुष्य खडतर होते पण त्यांनी माघार घेतली नाही. स्त्रीचा एक व्यक्ती म्हणून विचार व विकास करणाऱ्या पंडिता रमाबाईंचे काम असाधारण असेच आहे.

## कृतिपत्रिका - ४

**उतारा क्र. ४.**

**प्र.१.** (१) (i) (अ) मुक्तिमिशन-मुली स्वावलंबी

(ब) प्रार्थनामंदिराचा आराखडा - रमाबाई

(क) अंध व्यक्ती - ब्रेल लिपी

(ड) संघर्षाची कहाणी - रमाबाईंचे आयुष्य

(२) (i) (अ) वेताच्या खुर्च्या विणणे.

(ब) भांड्यांना कल्हई करणे

(ii) ब्रेल लिपी

(३) पंडिता रमाबाईंनी मुक्तिमिशनमध्ये स्त्रियांसाठी केळीच्या सोपट्यापासून टोपल्या बनवणे, वाखाच्या दोऱ्या वळणे, वेताच्या खुर्च्या विणणे, लेस, स्वेटर, मोजे विणणे, गाई-बैलांचे खिल्लार, शेळ्या मेंढ्यांची चरणी, म्हशींचा गोठा, दूधदुभते, कुक्कुटपालन, सांडपाणी-मैल्यापासून खत, भांड्यांवर नावे घालणे, भांड्यांना कल्हई करणे, हातमागावर कापड-सतरंज्या विणणे, घाण्यावर तेल काढणे, छापखान्यातील टाईप जुळवणे-सोडणे, चित्रे छापणे, कागद मोडणे - पुस्तक बांधणे, दवाखाना चालवणे, धोबीकाम असे कितीतरी लहान-उद्योग सुरू केले.



### खेळूया शब्दांशी

(अ) (१) **आराखडा :** खडा, खरा, आख

(२) **सुधारक :** सुधा, धार, धाक, धारक, कर, सुर

(आ) तरंग, सारंग, प्रारंभ, आरंभ, निरंक, परंतु, बेरंग

(इ) (१) मस्तक (२) ममता (३) सागर

(४) सडक (५) मांजर (६) आवास

(ई) विद्यार्थ्यांनी स्वत: कृती करा.

### खेळ खेळूया

(१)

| | | | |
|---|---|---|---|
| अ | णा | श | त्या |
| का | ति | चा | ल |
| हा | मा | बै | रि |

**अति शहाणा त्याचा बैल रिकामा**

| | | | |
|---|---|---|---|
| ए | भा | ना | ध |
| रा | क | ड | ध्या |
| भ | चिं | र | X |

**एक ना धड भाराभर चिंध्या**

| | | | |
|---|---|---|---|
| ऐ | ज | चे | क |
| ना | का | वे | ना |
| म | रा | वे | चे |

**ऐकावे जनाचे करावे मनाचे**

| | | | |
|---|---|---|---|
| चो | शी | डू | शा |
| र | फा | न | न्या |
| सो | X | सं | ला |

**चोर सोडून संन्याशाला फाशी**

| | | | |
|---|---|---|---|
| घ | घ | ती | X |
| रो | X | ली | च्या |
| री | मा | X | चु |

**घरोघरी मातीच्या चुली**

(२) (अ) अरेरे ! (आ) चूप ! (इ) शी ! (ई) अबब !

(३) आज सुट्टी असूनही मला लवकर जाग आली होती. बाबा रोज सकाळी फिरायला जातात. आज मीही त्यांच्याबरोबर फिरायला निघालो. केवढी! शांतता होती बाहेर. ना मोटारींचा आवाज, ना धूर. पूर्वेकडे हळूहळू सूर्य वर येत होता. आकाशात तांबूस प्रकाश पसरला होता. ढगांना लाली चढली होती. इतक्यात काय गंमत झाली. एका झाडावरून पक्ष्यांचा थवा उडू लागला. मला खूप मज्जा वाटली. जरा नजर वळवून पाहतो तर काय, एकेका झाडावरून पक्ष्यांचे थवेच्या थवे उडत होते. त्यांचा किलबिलाट तर मन मोहून टाकणारा होता. हवेत मंद गारवा होता. कसलीही गडबड नाही, गोंधळ नाही. वातावरण अगदी आल्हाददायक होते. मी शुद्ध हवा अनुभवत होतो. मला खूप प्रसन्न वाटत होते. या निर्मळ निसर्गाचा मी प्रथमच आनंद घेत होतो. बाबांशी गप्पा मारत मी कधी घरी परतलो, हे कळलेच नाही. कोणतेही हेल्थ ड्रींक न घेता मला आज ताजेतवाने वाटत होते. मी मनाशी पक्का निश्चय केला की रोज सकाळी बाबांबरोबर फिरायला जायचं आणि निसर्गाचा बूस्टर डोस घ्यायचा.

(४) (१) आणि (२) परंतु (३) म्हणून
(४) किंवा (५) तरी (६) वा

**शोध घेऊया**

विद्यार्थ्यांनी स्वत: कृती करा.

---

## ११. लेक

**स्वाध्याय**


**प्र.१.** (अ) लेक घरात नसताना कवयित्रीची अवस्था विचित्र होते. वेळ जाता जात नाही जणू काही वेळ थांबूनच राहिली आहे असे वाटते. मन खूप उदास होते. कशातही लक्ष लागत नाही.

(आ) कवयित्रीला आपली लेक बोलकी चिमणी वाटते कारण ती सगळ्या घरात हसत–खेळत, बागडत असते. तिची घरात अखंड बडबड सुरू असते.


(इ) थोडे रागावले तर कवितेतील लेक रुसून बसते.



**प्र.२.** (अ)




(आ)




**प्र.३.**

| | | | |
|---|---|---|---|
| अविस्मरणीय | अवांतर | अस्तर | आठ्या |
| आमूलाग्र | आस | आसू | उमेद |
| ऊर | अंकुर | कपाशी | कर्मयोगिनी |
| काटकसर | काळीज | कुंदन | खुळे |
| गहिवर | गाबड्या | गुजराण | गोंदण |
| गंधवती | जुजबा | ठणठणीत | तप्त |
| तान्ह्या | दुखणेकरी | दुर्गम | दुथडी |
| धास्ती | धुसफुस | नानेटी | निरपेक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| पराङ्मुख | पारंपरिक | पोशिंदे | पंचमहाभूते |
| प्रबोधन | फलद्रूप | फुशारकी | मिजास |
| यथेच्छ | रानमेवा | रोजगारी | वक्ता |
| वणवा | विरजण | व्रात्य | शाळू |
| शिंपी | सत्शील | सुगी | हळवे |
| हेवा | हेलावणे | | |

**कृतिपत्रिका**

**प्र.१.** (१) (i) लेकीला (ii) लेक घरात नसते.

(२) (i) तांबडं → कुंदन

(ii) लेकीला ही भाषा कळते → निसर्गाची | हिरवं → गोंदण

(३) सगळे जग जरी आपल्यावर रागावले, तरी त्याविषयी मुळीच चिंता करू नये. पण आपली लाडाची लेक जणू फुलाची पाकळी मात्र कधीच रुसून बसू नये.

(४) माझी ताई घरात नसली, तर मला काही सुचेनासे होते. चैन पडत नाही. ताई घरी कधी येईल? याची मी वाट पहात बसते. ती नसल्यामुळे माझा अभ्यास अपूर्ण राहतो, माझ्याशी कुणी खेळायला नसतं की भांडायला कुणी नसतं.

**अतिरिक्त कृती**


**प्र.१.** अस्मिता जोगदंड चांदणे

**प्र.२.** लेक असता मनाची, सारी काळजी मिटते;
लेक असता घराची, रोज समई पेटते.


**प्र.३.** आपल्या देशात मुलींना दुय्यम वागणूक दिली जाते. पण मुलाइतकीच मुलगी महत्त्वाची आहे. मुलगा घराचा कुलदीपक असेल तर मुलगी देखील पणती आहे. मुलगी घरात असेल तर घरातील वातावरण आनंदी व प्रसन्न रहाते. घराला घरपण येते. मुलगी घरातील सर्व माणसांची काळजी घेते. तिला योग्य तो सन्मान द्या असा संदेश या कवितेतून मिळतो.



**प्र.४.** लेकीच्या / मुलीच्या निरागसपणाचे वर्णन आणि मुलीच्या घरातील अस्तित्वाचे महत्त्व हा या कवितेचा विषय आहे.

**प्र.५.**  वा! ससा किती जलद पळतोय.

 किती छान! मुलगी आहे.

 अरेरे! पायाला ठेच लागली वाटते.

**खेळूया शब्दांशी**

(अ) (१) मिटते – पेटते (२) हसते – बसते (३) उरास – उदास

(४) भाषा – आशा (५) कळते – लागते.

**भाषेची गंमत पाहूया**

- (१) सर जाताना प्या ना ताजा रस
  (२) काका वाचवा, काका.

तुम्हीही अशा प्रकारची वाक्ये तयार करून लिहा. पाहा कशी गंमत येते.

विद्यार्थ्यांनी स्वत: कृती करा.

**विचार करा. सांगा.**

- दुसऱ्यांना देऊन टाकतो.
- गोधडी, पायपुसणी
- घरात कपड्यांचा खूप साठा होणार नाही.

# १२. रोजनिशी

## स्वाध्याय

**प्र.१.** (अ) वैष्णवीच्या शाळेत बालदिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमप्रसंगी आलेल्या पाहुण्यांनी बालदिनानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना खाऊ देण्यात आला.

(आ) शिवारामध्ये गेल्यावर मुलांनी ज्वारी, तुरी, भुईमूग आणि कपाशी ही पिके तर पेरू, सीताफळ, आवळा, चिंच, बोर ही फळझाडे पाहिली.

**प्र.२.** (अ) वैष्णवीच्या रोजनिशीतील १६ नोव्हेंबर या दिवसाचे पान मला सर्वांत जास्त आवडले. या दिवशी मित्रमैत्रिणींबरोबर बर्थडे पार्टी करण्यापेक्षा वैष्णवीने तिचा वाढदिवस आदिवासी दुर्गम भागातील वसतिगृहातील मुलांबरोबर साजरा केला.

(आ) वसतिगृहातील आदिवासी दुर्गम भागातील मुलंमुली शिक्षणासाठी आईवडिलांपासून दूर राहतात हे पाहून वैष्णवीला गहिवरून आले.

**प्र.३.**

| १७ नोव्हेंबर – |
|---|
| आजपासून आमची दिवाळीची सुट्टी सुरू झाली. सुट्टी असूनही |
| मी लवकर उठली. आज आईची जरा घाई होती. तिने जवळजवळ |
| सर्वंच फराळाचे डबे बनवून तयार ठेवले होते. आई, बाबा आणि |
| मी 'आपले घर' या अनाथाश्रमात गेलो. आम्ही तिथल्या मुलांना |
| दिवाळीचा फराळ व कपडे दिले. ते पाहून मुलांना खूप आनंद |
| झाला. मी थोडा वेळ त्यांच्याबरोबर खेळले, गप्पा मारल्या, त्यांनी |
| काढलेली सुंदर सुंदर चित्रे पाहिली. त्यांनी तयार केलेल्या पणत्या, |
| भेटकार्ड व कंदील आम्ही विकत घेतले. संध्याकाळी आम्ही घरी |
| आलो. पण माझ्या मनात त्या अनाथाश्रमातील मुलांचेच सारखे |
| विचार येत होते. |



## कृतिपत्रिका – १

**उतारा क्र. १**

**प्र.१.** (अ) (१) (i) बालदिन

(ii) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

(२) (i) डॉ. रमेश कोठावळे

(ii) असत्य

(३) रोजनिशी म्हणजे रोजच्या घडामोडींची नोंद ठेवणे. रोजनिशी लिहावी कारण आपल्याला आपल्या कामांचा त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे योग्य क्रम ठरवता येतो. लहान मोठ्या गोष्टींची नोंद ठेवल्याने कोणत्याही गोष्टीची गरज लागली तर त्याचा फायदा होतो. रोजनिशी लिहिल्याने स्वत:शी संवाद साधता येतो. दिवसभरात आपण ज्या गोष्टी करतो त्यातून अनेक गोष्टी शिकता येतात. स्वत:ला समजून घेता येते. दिवसभरात आपल्याला भेटलेल्या व्यक्तींनाही समजून घेण्यास मदत होते. आपली आकलनशक्ती व स्मरणशक्ती वाढते. लिखाणामध्ये सुधारणा होऊन भाषेवर प्रभुत्व प्राप्त होते. आपण केलेल्या चुका सुधारण्याची संधी मिळते. रोजनिशी आपला चांगला मित्र/मैत्रीण होऊन आपण एकटे आहोत असे वाटत नाही. मनावरील ताण/चिंता कमी होतात. आपल्यातील सकारात्मकता वाढून अडचणींवर मात करण्याचे बळ मिळते. एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या कृती करण्याचा आपण विचार करू लागतो त्यामुळे आपला आत्मविश्वास वाढतो. असे रोजनिशी लिहिण्याचे अनेक फायदे आहेत. रोजनिशी लिहिणे ही एक चांगली सवय आहे.

## कृतिपत्रिका - २

### उतारा क्र. २

**प्र.१.** (अ) (१) (i)

फळांनी लदबदलेली झाडे:
- **पेरू**
- **सीताफळ**
- **आवळा**
- **चिंच**
- **बोर**

(ii) श्री. पाटील सर

(२) (i)

या गोष्टी बघून मुले आनंदी झाली:

| | | | |
|---|---|---|---|
| **मोत्यासारखी ज्वारी असलेली कणसं** | **तुरीच्या शेंगा** | **भुईमुगाच्या शेंगा** | **कपाशीच्या बोंडातून डोकावणारा पांढराशुभ्र कापूस** |

(ii) दगडांच्या मारानं भरपूर **बोरं** खाली पडली.

(३) मे महिन्याच्या सुट्टीत मी माझ्या कोकणातील गावी गेलो होतो. मे महिन्यात कोकणात खूप मजा असते कारण या हंगामात आंबे, फणस, काजू, करवंदे, जांभळे, रातांबे अशी खूप फळे असतात. एकदा संध्याकाळी मी, माझा भाऊ व गावातील बरीचशी मुले शेतात गेलो होतो. खाली घरे व उंचावर गेल्यावर गावातील बऱ्याच लोकांची शेते आहेत. आजूबाजूला दाट झाडी होती. शेतात पेरणी, नांगरणीची कामे चालू होती. अनेल लोक वर गुरांना चरण्यासाठी घेऊन आले होते. शेताच्या बाजूला असलेल्या झाडांमध्ये विविध आंब्यांची झाडे होती. हापूस, पायरी, रायवळ तसेच वावडिंग, निर्गुंडी, कडुनिंब, रुईची छोटी झाडे होती. त्या बऱ्याच औषधी झाडांची माहिती भावाने



आम्हाला दिली. नागवेल दाखवली ज्यापासून विडा बनवतात. विविध रंगांची फुले बघून तर खूप प्रसन्न वाटत होते. झाडांवर अनेक पक्षी होते जे मुंबईत बघायला देखील मिळत नाहीत. आम्ही तेथे करवंदे, जांभळे खूप खाल्ली आणि काळोख पडण्यापूर्वी घरी यायला निघालो.

## कृतिपत्रिका - ३

### उतारा क्र. ३

**प्र.१.** (अ) (१) (i) खाऊ

(ii) १६ नोव्हेंबर

(२) (i) समाज कल्याण विभागाच्या वसतिगृहात असणारी मुले **आदिवासी दुर्गम भागातील होती.**

(ii) (अ) असत्य (ब) सत्य

(३) वैष्णवीचा वाढदिवस १६ नोव्हेंबर या दिवशी होता. घरातील अनेक नातेवाईकांनी, मित्रमैत्रिणींनी सकाळपासूनच वैष्णवीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. वैष्णवी व वैष्णवीचे आईबाबा वैष्णवीचा वाढदिवस म्हणून आदिवासी समाज कल्याण विभागाच्या एका वसतिगृहात गेले. आदिवासी भागातील मुलेमुली शिक्षण घेण्यासाठी तेथे राहतात. त्या सर्व मुलांना वैष्णवीने खाऊ वाटला. आईवडिलांपासून, आपल्या घरापासून लांब रहाणाऱ्या मुलांना पाहून वैष्णवीला वाईट वाटले. वैष्णवीच्या आईबाबांनी तिला समजावले. त्या सर्व मुलांना भेटून वैष्णवीला शिकण्याची नवी उमेद मिळाली.

## खेळ खेळूया

(अ) गर्वाचे घर खाली.
(आ) कामापुरता मामा.
(इ) पळसाला पाने तीनच
(ई) थेंबे थेंबे तळे साचे
(उ) आगीतून उठून फुफाट्यात पडणे
(ऊ) अति तेथे माती
(ए) नावडतीचे मीठ अळणी

# १३. अदलाबदल

**स्वाध्याय**

**प्र.१.** अमृत व इसाब यांच्यामध्ये सारख्या असणाऱ्या गोष्टी
- **कपड्यांचे रंग**
- **कपड्यांचे आकार**
- **कपड्यांचे कापड**
- **एकच वर्ग**
- **एकच शाळा**
- **घरे समोरासमोर**

**प्र.२.** (१) गावातील काही मुले निंबाच्या झाडाखाली जमली होती.

(२) एका व्रात्य मुलाला एक खोडकर कल्पना सुचली.

(३) अमृत व इसाबने शर्टांची अदलाबदल केली.

(४) हसनभाई काय सांगत आहेत ते ऐकायला शेजारपाजारच्या बायकाही तेथे जमल्या.

(५) अमृत व इसाबच्या परस्परांवरील प्रेमाची गोष्ट ऐकून सर्वजण हेलावून गेले.

**प्र.३.** (अ) घरी आलेल्या पाहुण्यांना बाबांनी राहण्यासाठी <u>गळ घातली</u>.

(आ) बाळू नवीन छत्री कोठेतरी विसरून आला. हे पाहून आईचा <u>पारा चढला.</u>

(इ) रस्त्यावर भांडणाऱ्या कुत्र्यांच्या आवाजाने नीताच्या <u>पोटात गोळा आला</u>.

(ई) त्याची करुण कहाणी ऐकून सर्वांची मने <u>हेलावून गेली</u>.

**कृतिपत्रिका – १**

**उतारा क्र. १**

**प्र.१.** (१) (i) अमृत व इसाब यांच्या कपड्यांत सारख्या असलेल्या गोष्टी
- **आकार**
- **रंग**
- **कापड**

(ii) (अ) होळी

(२) (i) गावातील मुले निंबाच्या झाडाखाली जमली.

(ii) (अ) सत्य (ब) असत्य

(३) तेजस हा माझा सर्वात आवडता मित्र आहे. तो माझ्याच वर्गात शिकतो. आम्ही एकाच सोसायटीत राहतो. त्यामुळे जवळजवळ दिवसभर आम्ही एकत्रच असतो. एकत्र विविध खेळ खेळतो.
तेजस अभ्यासातही हुशार आहे. गणित हा त्याचा आवडता विषय. त्यात तो पैकीच्या पैकी गुण मिळवतो. कोडी सोडवण्याचीही त्याला आवड आहे. तो नेहमी सर्वांना मदत करतो. अभ्यासात कुणाला काही शंका असेल तर तो ती पटकन दूर करतो. शिक्षकांचाही तो आवडता विद्यार्थी आहे. त्याने कुठे काही वाचले, नवीन गोष्ट पाहिली की त्याविषयी तो मला माहिती सांगतो आणि मीही त्याला सांगतो. प्रत्येक गोष्ट करताना आम्ही एकमेकांना सांगून करतो. अशी आमची अतूट मैत्री आहे.

**अतिरिक्त कृती**

**प्र.१.** अमृतला आईची भीती वाटत होती.

**प्र.२.** (अ) पाशी (ब) सोबत

**कृतिपत्रिका – २**

**उतारा क्र. २**

**प्र.१.** (अ) (१) (i) (अ) केशवला (ब) अमृतला

(ii) सत्य

(२) (i) (अ) अमृतला जमिनीवर केशवने ढकलले.

(ब) शर्टासाठी इसाबच्या वडिलांनी सावकाराकडून पैसे कर्जाऊ घेतले होते.

(ii) केशवला

(३) सुट्टीच्या दिवशी मी मित्रांबरोबर क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, लगोरी इत्यादी मैदानी खेळ खेळतो. तर दुपारच्या वेळी घरात बसून कॅरम, बुद्धिबळ इत्यादी बैठे खेळ खेळतो.

**कृतिपत्रिका - ३**

**उतारा क्र. ३**

**प्र.१.** (अ) (१) (i) 'महत्त्व कशाला आहे' हे हसनभाईंना अमृतने शिकवले.

(ii) हसनभाईंनी

(२) (i) (अ) अमृतची आई (ब) शेजारपाजारच्या बायका

(ii) हसनभाई

(३) माझ्या मित्राचे दुसऱ्याला मदत करणे, कोणती गोष्ट चांगली व कोणती गोष्ट वाईट हे सांगून वेळीच आपल्या मित्राला सावध करणे हे दोन गुण सर्वात जास्त आवडतात.

**खेळूया शब्दांशी**

(अ) (१) नवा - **शर्ट** (२) सुई - **दोरा**

(३) होळी - **सण** (४) कुस्ती - **खेळ**

(आ) (अ) व्रात्य (आ) कल्पना (इ) गोष्ट

(इ) करी → शेतकरी, कष्टकरी, वारकरी, कातकरी



**खेळ खेळूया**

*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ डो | | | | |
| २ के | ३ र | | | |
| | ज | | | |
| | ४ नी | ५ र | | |
| | | य | | |
| | | ६ त | न | या |

*

*

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ आ | | | | | | |
| ळ | | | | | | |
| २ शी | त | ३ ल | | | | |
| | | हा | | | | |
| | | ४ न | वी | ५ न | | |
| | | | | का | | |
| | | | | ६ र | ड | णे |

* (१) माझ्या मित्राने / मैत्रिणीने आज डबा आणला नाही तर मी त्याला माझ्या डब्यातील पोळी भाजी देईन.

(२) शाळेत पिण्याच्या पाण्याचा नळ कोणीतरी विनाकारण सुरू ठेवला तर आम्ही तो बंद करू आणि वाहणारे पाणी वाचवू.

(३) वर्गातील एका विद्यार्थ्याने वर्गात कचरा केला आहे व तो आम्ही पाहिला तर त्या विद्यार्थ्याला कचरा न करण्याविषयी समजावू आणि त्याला कचरा एकत्र करून कचरापेटीत टाकायला सांगू. त्याने आमचे म्हणणे ऐकले नाही तर आम्ही स्वत: कचरा कचरापेटीत टाकू आणि वर्ग स्वच्छ ठेवू.

(४) सहलीत आमचा मित्र किल्ल्याच्या भिंतीवर नावे लिहित आहे तर आम्ही त्याला किल्ल्यांचे महत्त्व सांगून भिंतीवर नावे लिहिण्याची कृती करू नकोस असे समजावून सांगू.

---

# १४. संतवाणी

* विद्यार्थ्यांनी स्वत: कृती करा.

---

## आम्ही कथा लिहितो.

एकदा जंगलात भटकता भटकता एक हरिण जंगलातून बाहेर आले. जंगलाच्या बाहेरून जाणारी एक प्रवासी रेल्वे त्याला दिसली. हे सापासारखे लांब काय बरं पळत आहे असा विचार करता करता हरिणही त्या प्रवासी रेल्वेबरोबर धावू लागले.

पुढे एका स्टेशनवर प्रवासी रेल्वे थांबली. हरिण मात्र पुढे धावतच राहिले. मागे वळून पाहते तर काय रेल्वे थांबलेली. हरणाला वाटले, ती प्रवासी रेल्वे दमली म्हणून थांबली व आपणच जिंकलो. ते हरिण विजयी झाल्याच्या थाटात जंगलात परतले. इतर सर्व प्राण्यांबरोबर ते फुशारक्या मारू लागले. घडलेला सर्व प्रसंग त्याने इतरांना सांगितला. 'आपण रेल्वेला हरवले. केवढे मोठे काम केले. आपणच सर्वांत चपळ'अशा आविर्भावात ते फिरू लागले.

कोल्हा हुशार होता. त्याला शंका आली. तो हरणाला म्हणाला, ''तू जिंकल्याचे कुणीही पाहिले नाही. चल पुन्हा धावून दाखव.'' ते दोघेजण पुन्हा जंगलाबाहेर आले. हरिण मोठ्या दिमाखातच येणाऱ्या एका रेल्वेबरोबर धावू लागले. कोल्हासुद्‌धा त्या दोघांच्या मागे धावायला लागला.



हरणाच्या दुर्दैवाने ती रेल्वेगाडी मालगाडी होती. त्यामुळे ती कुठेही न थांबता पुढे पुढे वेगाने निघून गेली. बिचारे हरिण मात्र तिच्यामागे धावून धावून दमले आणि मटकन खाली बसले. त्याच्यात पुढे धावण्याचे त्राणच उरले नव्हते. त्याने कोल्ह्याकडे आपण शर्यत हरल्याचे कबूल केले व म्हणाले, ''खरोखरच तंत्रज्ञानाचा वापर करून मानवाने आपल्यापेक्षा वेगवान वस्तू बनवली आहे''.

**शीर्षक** – गर्वाचे घर खाली

(२) अनिकेत अभ्यासात सामान्य असा मुलगा होता. आईला तिच्या कामात तो नेहमी मदत करीत असल्यामुळे त्याला अभ्यास करावयास फारसा वेळ मिळत नसे. अखेर व्हायचे तेच झाले. अनिकेत आठवीत नापास झाला. त्याच्या आईला खूप मोठा धक्का बसला. तिने अनिकेतची समजूत काढली. परंतु अनिकेत मात्र अस्वस्थ होता. नापासाचा कलंक घेऊन जगण्यापेक्षा आत्महत्येचा मार्ग त्याला अधिक योग्य वाटत होता. आईला आणखी त्रास नको या भावनेनं तलावात उडी मारून स्वत:ला संपवण्याचा त्याचा विचार पक्का झाला.

अनिकेत गावाबाहेर असलेल्या तळ्याकाठी आला. पोहता येत नसल्यामुळे पूर्ण भरलेल्या तलावाकडे बघून त्याला क्षणभर भीती वाटली. तेवढ्यात एक घटना घडली. तलावाच्या काठावर असणाऱ्या झाडांवर बरीच माकडे होती. त्या माकडांमधील एक माकडाचे लहान पिल्लू झाडावरून खाली पडले. पिल्लाने झाडाच्या खोडाजवळ जाऊन वर चढण्याचा प्रयत्न केला. पुन्हा ते खाली पडले. प्रत्येक वेळेस झाडावर जाण्याचा ते प्रयत्न करत होते. अनिकेत एकटक नजरेनं पिल्लाचा झाडावर जाण्याचा प्रयत्न पाहात होता. अनेक वेळा प्रयत्न केल्यावर अखेरीस ते माकडाचे पिल्लू झाडावर चढले व इतर माकडात पुन्हा खेळू लागले. अनिकेतला आनंद झाला. माकडाच्या पिल्लाप्रमाणे आपणही पुन्हा प्रयत्न करू. चांगल्या मार्कांनी पास होऊ अशी नवी आशा त्याच्या मनात निर्माण झाली.

आत्महत्या करण्यासाठी तलावाकाठी आलेला अनिकेत घराकडे निघाला. अभ्यासाचा जोरदार प्रयत्न करून आपणही माकडाच्या पिल्लाप्रमाणे वरच्या वर्गात जाऊ असे त्याने ठरवले.

**शीर्षक** – प्रयत्नांती परमेश्वर

# निबंध लेखन

## (१) माझा आवडता छंद

'जितक्या व्यक्ती, तितके वेगवेगळे छंद'. कुणाला क्रिकेटची मॅच पाहण्याचा छंद असतो, तर कुणाला गाण्याचा; कुणाला पोस्टाची तिकिटे गोळा करण्याचा छंद असतो, तर कुणाला निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत हिंडण्याचा छंद असतो. कुणी जुनी नाणी गोळा करते, कुणी पुस्तकी किडे असतात तर कुणी रंगांमध्ये रमतात. माझा छंद मात्र थोडा वेगळा आहे. लहानपणापासून मला छंद आहे, तो मुंग्यांची रांग पाहण्याचा. तुम्ही म्हणाल हा कसला छंद !

आम्ही मुंबईत प्रभादेवीला तळमजल्यावर राहायचो, त्यामुळे सकाळपासून इमारतीच्या आवारात माझे खेळणे चालायचे. इमारतीसमोरूनच मोठा रस्ता जात असल्याने वाहनांची वर्दळ असे, त्यामुळे आवाराबाहेर जायला परवानगी नसे. दुपारच्या वेळी सर्वच मित्रमंडळी आपापल्या घरात असत. कोणी टी. व्ही. वरील कार्यक्रम पाहत तर कोणी झोपत असे. अशावेळी सोबत खेळायला कोणीच नसे. मग दारात पायरीवर बसून मुंग्यांची रांग पाहणे हे एकच काम असे.

मुंग्यांचे ते शिस्तीने एका मागे एक चालणे, सतत कशाच्या ना कशाच्या तरी शोधात फिरणे, भिंतीवर चढताना कितीही वेळा पडले तरी हार न मानणे, चिकाटीने आपले काम करीत राहणे, सतत मेहनत करणे, एखादा मोठा दाणा मिळाला तर एकमेकांच्या मदतीने तो आपल्या वारूळात नेणे, अशा कितीतरी गोष्टी मी टक लावून बघत असे.

मोठे झाल्यावरही हा छंद सुटला नाही. संध्याकाळी शाळेतून आलो की दिवसभराच्या अभ्यासाने थकवा आलेला असे, अशावेळी मुंग्यांच्या त्या रांगा पाहिल्या, त्यांचे ते सतत कष्ट करणे पाहिले की हा थकवा कुठल्या कुठे दूर पळत असे व आपणही अशी नेहमी मेहनत केली पाहिजे, असे नकळतपणे वाटून जात असे. याचाच फायदा असा झाला की आजपर्यंत शाळेतून माझा पहिला नंबर कधी सुटला नाही.



आता मी सातवीला आहे, पण आजही संध्याकाळी शाळेतून आल्यावर न चुकता त्या मुंग्यांच्या रांगा पाहतो. त्यांना पाहताना आईबाबांचे कष्ट आठवतात, मनाला नवी प्रेरणा मिळते. आजूबाजूला कितीही गोंगाट असला, गोंधळ असला तरी आपले काम करत राहायचे हा मुंग्यांचा संदेश आठवतो व मन अभ्यासात एकाग्र होते.

माझ्या छंदाने नकळतपणे माझ्यावर अनेक संस्कार केले आहेत. कितीही संकटे आली तरी या संकटांवर मात करून आपले काम चालूच ठेवायचे, हे या छंदानेच मला शिकवले.

## (२) आमची सहल

सहल कोणाला आवडत नाही ? मागच्या सुट्टीत आम्ही सहलीला गोव्याला गेलो होतो. मलासुद्धा सहल खूप आवडते. सहल म्हटली की, एक वेगळे चैतन्य निर्माण होते. माझ्या घरातील सर्वजण आम्ही रात्री बसने निघालो आणि सकाळी ८ वाजता गोव्याची राजधानी पणजी येथे पोहोचलो. तेथून आम्ही कलंगुट बीचवर कामत नावाच्या एका हॉटेलात रहायला गेलो.

गोवा भारताच्या समुद्रकिनारी वसलेले एक छोटेसे सुंदर राज्य आहे. तेथे अनेक समुद्रकिनारे आहेत. उदा. कलंगुट, बागा, अंजुना, कोलवा. तेथील समुद्रकिनाऱ्यांवर फिरण्याची मजा वेगळीच. आम्ही तेथील बागा बीचवर गेलो होतो. आम्ही मुलांनी तेथे पाण्यात खूप मजा केली.

गोव्यामधील फोंडा शहरात शांतादुर्गा–मंगेशी, महाळसा अशा देवतांची अतिशय सुंदर आणि जुनी मंदिरे आहेत. मंदिराच्या आजूबाजूचा परिसर खूप मोठा असून संध्याकाळी तेथील दिव्यांची आरास पहाण्यासारखी असते. तेथून आम्ही घरातील सर्व मंडळी नौका विहार करण्यासाठी मायाम लेकला गेलो. तेथे नौकाविहाराचा आनंद घेतला. नंतर आम्ही ओल्ड गोव्यामधील जुनी चर्च पाहिली. त्या सर्व वास्तूंचे बांधकाम जुन्या मजबूत दगडांनी केलेले आहे. गोवा सगळ्यात जास्त प्रसिद्ध काजूसाठी आहे. गोव्यात विदेशी पर्यटकांची संख्यासुद्धा खूप असते. गोव्यामध्ये बीचच्या तसेच मंदिरांच्या बाहेर पर्यटकांसाठी अनेक वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या असतात. त्यामध्ये रंगीबेरंगी पंखे, शंख–शिपल्यांच्या वस्तू, टोप्या, चष्मे, दागिने, कपडे तसेच

चिक्की, सरबत, काजू असे खाद्य पदार्थसुद्धा असतात. आम्ही तेथे काजू विकत घेतले.

गोव्यामध्ये मासे खाणाऱ्या लोकांसाठी तर मेजवानीच असते. विविध प्रकारचे ताजे मासे खाण्याचा आनंद गोव्यातच. आम्हीसुद्धा आठ दिवस खूप मासे खाल्ले. आठ दिवस कुटुंबातील सर्वांनी खूप धमाल केली. गोव्याची ती सहल मी आयुष्यभर विसरणार नाही.

**(३) माझा भाऊ**

अथर्व हा माझा लहान भाऊ आहे. तो पाचवीत शिकतो. वर्गात शिक्षक शिकवत असताना एकाग्रतेने तो ऐकतो आणि शिकवलेल्या गोष्टींचे तो नीट आकलन करतो.रोजचा शाळेत दिलेला गृहपाठ वेळच्या वेळी पूर्ण करतो. इंग्रजी व विज्ञान हे त्याचे आवडीचे विषय त्यात तो पैकीच्या पैकी गुण मिळवतो.

आम्ही एकाच शाळेत शिकतो त्यामुळे शाळेत जाताना शाळेतून येताना आम्ही बरोबरच असतो. खेळायला एकत्र असतो. आम्ही अभ्यासही एकत्र करतो. एकत्र असताना आम्ही खूप मजा करतो. कधी कधी आमच्यात भांडणेसुदधा होतात. मग आई आम्हांला रागावते. पण कितीही मोठे भांडण झाले तरी आम्ही थोड्या. वेळाने विसरून जातो व पुन्हा एकत्र येतो. अथर्व सर्वांशी नम्रतेने आणि प्रेमाने वागतो. शाळेतील मित्रांना मदत करण्यास केव्हाही तत्पर असतो.

अथर्वला खेळाची खूप आवड आहे. मैदानी खेळांमध्ये तो खूप चपळ आहे. क्रीडास्पर्धेत तो हमखास बक्षिसे मिळवितो. माझ्यापेक्षा लहान असूनही तो मोबाइल, कॉम्प्युटर सफाईने हाताळतो. एखादी वस्तू बिघडली तर ती दुरुस्त केल्याशिवाय तो स्वस्थ बसत नाही. त्याला अभ्यासात काही अडचण आली तर तो बिनधास्तपणे मला विचारतो. मलाही काही मदत लागली तर तो बिनदिक्कत करतो. तसेच त्याला वाचनाचीही अत्यंत आवड आहे. खासकरून त्याला साहसकथा आणि विज्ञानविषयक पुस्तके वाचायला खूप आवडतात.



घरात तो सर्वांत लहान असल्यामुळे सर्वांचा लाडका आहे. आमचे दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम आहे. तो घरात नसेल तर मला मुळीच करमत नाही. असा माझा भाऊ नेहमी आनंदी राहो आणि यशाची निरनिराळी शिखरे पार करो, हीच माझी सदिच्छा.

## पत्रलेखन

**(१) तुमच्या मित्राला राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले म्हणून त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

**ओंकार पटवर्धन**

**दिनांक:** १५ जून २०१९

प्रिय मित्र आर्यन,

सप्रेम नमस्कार.

अभिनंदन मित्रा, त्रिवार अभिनंदन! राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. स्पर्धेत तुला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले म्हणून तुझे मन:पूर्वक अभिनंदन. वर्तमानपत्रात ही बातमी वाचून मला खूप आनंद झाला. मी आनंदाने उड्या मारतच सर्वांना ही, बातमी सांगितली.

१५०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला असताना त्यातून प्रथम क्रमांक मिळवणे हे निश्चितच गौरवास्पद आहे. तुझी चित्रकला लहानपणापासूनच खूप चांगली आहे. जे पाहतोस ते हुबेहूब कागदावर रेखाटतोस. रंगसंगतीचेही तुला अचूक ज्ञान आहे. यासाठी तू लहानपणापासून खूप मेहनत घेतली आहेस. त्या मेहनतीचे फळ तुला या राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाच्या रूपात मिळाले आहे. यापुढे विविध स्पर्धांत भरपूर यश मिळव. असेच यश तुला नेहमी मिळत राहो, ही सदिच्छा.

काका, काकूंना माझा नमस्कार सांग. छोट्या विभाला अनेक आशीर्वाद.

**तुझा मित्र**

**ओंकार**

## बातमी लेखन

(१) (१) वरील बातमी ६ सप्टेंबरची आहे.
(२) इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिक्षक दिनात शिक्षकाची एक दिवसीय भूमिका पार पाडली.
(३) साने गुरुजी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. राऊत सर यांच्या अध्यक्षतेखाली हा शिक्षक दिन समारोप सोहळा संपन्न झाला.
(४) ५ सप्टेंबर या दिवशी नारायण पेठेतील साने गुरुजी विद्यालयात शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला.
(५) माननीय फटांगरे सरांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला.
(६) विद्यार्थिनी शिक्षिका कु. स्वाती मोरे हिने उपस्थितांचे आभार मानले.

(२) (१) सेवासदन विद्यालयामध्ये 'प्रजासत्ताक दिन' साजरा करण्यात आला.
(२) सकाळी ठीक ६ वाजता विद्यार्थ्यांची प्रभात फेरी निघाली.
(३) विद्यार्थ्यांनी भारतमाता, महात्मा गांधीजी, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस इत्यादींच्या वेशभूषा सादर केल्या.
(४) ठीक ७ वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला.
(५) जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.
(६) 'आजच्या काळात प्रजासत्ताकाचे महत्त्व' या विषयावर मा. शिक्षणाधिकारी यांनी आपले विचार मांडले.



## सूचना फलक

(१)

**कडूस ग्रामपंचायत** दिनांक – ६-४-२०२२

उद्या दि. ७ एप्रिल २०२२ रोजी ........................................

........................................ **वेळ** – सकाळी १० ते ४

(१) ही सूचना 'जागतिक आरोग्य दिनानिमित्त' आयोजित भव्य रक्तदान शिबिराबाबत आहे.
(२) 'जागतिक आरोग्य दिनानिमित्त' भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.
(३) रक्तदान करणाऱ्याला पुढील एका वर्षासाठी मोफत आरोग्य तपासणीचे कार्ड दिले जाणार आहे.
(४) गंगाराम शेतकरी संध्याकाळी ५ वाजता शेतातून घरी येणार आहे त्यावेळी त्याला रक्तदान करता येणार नाही. कारण रक्तदानाची वेळ सकाळी १० ते ४ अशी आहे.
(५) रक्तदान शिबिराचे आयोजन डॉ. एस. एस. राव हॉस्पिटल येथे करण्यात आले आहे.

**दिनांक :** ५/१०/२०२२

आव्हाट परिसरात कचरा .............................. बहुसंख्येने उपस्थित रहावे.

(२) (१) ही सूचना ५ ऑक्टोबर, २०२२ ची आहे.
(२) व्याख्यान ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी आव्हाट गावातील एस.टी स्टँडजवळील मोकळ्या मैदानात होणार आहे.
(३) नागरिकांना दुर्गंधी, अस्वच्छता व डास यांचा त्रास सहन करावा लागत आहे.
(४) व्याख्यानात 'कचऱ्याची विल्हेवाट आणि कचऱ्यापासून खतनिर्मिती' याविषयी माहिती देण्यात येणार आहे.
(५) आव्हाट गावाच्या एस्. टी. स्टँडजवळील मोकळ्या मैदानात व्याख्यान होणार आहे.

## जाहिरात

नाट्यसंस्कार कला अकादमी, पुणे प्रस्तुत

गंगोत्री ग्रीनबिल्ड आयोजित दिनांक: ९/११/२०१७



**धमाल बालनाट्य**

दि. १४ नोव्हेंबर, संध्या. ५ वा.

**मुले चोर पकडतात**

**लेखक :** गंगाधळ गाडगीळ

**दिग्दर्शन :** जयंती देव

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कराड, जि. सातारा

**कलाकार : सुबोध भट** सह नाट्यसंस्कारचे माजी कलाकार

शिल्लक तिकीट विक्री हॉलवर दि. १२ नोव्हेंबर पासून स. ९ ते ११ सायं. ५ ते ७

(१) ही जाहिरात बालनाट्याची आहे.

(२) नाटक मुलांसाठी आहे.

(३) ज्या दिवशी वर्तमानपत्रात जाहिरात आली त्या दिवशी ९ तारीख होती.

(४) नाटकाचे दिग्दर्शक जयंती देव आहेत.

(५) नाटकाचा खेळ यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, जिल्हा सातारा येथे होणार आहे.

## प्रथम सत्र परीक्षा (पाठ १ ते ७)

**विभाग - १ (गद्य) प्र.१. (अ) प्रकरण - ४ (आ) प्रकरण - ७**

**विभाग - २ (पद्य) प्र.२. (अ) कविता - ३ (आ) कविता - ६**

**विभाग - ३ (अ) (१)** ''मग सांगेन. घरात जा घेऊन.'' मी म्हटले .

(२) **नामे** – ड्रायव्हर, गाडी

(३) चेहरा उजळणे – आनंद होणे

**वाक्य** – नवीन सायकल पाहून राणीचा चेहरा उजळला.

(४) आम्ही तुझ्या पत्राची वाट बघत आहोत



**(आ) (i)** (१) आकाश (२) खग **(ii)** साडी , साखर

**(iii)** (१) ताई/वहिनी (२) आई **(iv)** (१) माणसे (२) गुराखी

**विभाग - ४**

**प्र.४. (अ) (१)** मदतीचे आवाहन तेजस विश्वनाथ पवार साठी केले आहे.

(२) तेजसला मदतीची गरज दहावीनंतरच्या पुढील शिक्षणासाठी आहे.

(३) तेजसला दहावी परीक्षेत उत्तम गुण मिळाले आहेत.

(४) मदत देणाऱ्यांनी श्री सचिन पाटील यांच्याशी संपर्क साधायचा आहे.

**(आ)** पृष्ठ क्रमांक – ५५ वरील निबंध पाहा.

## द्वितीय सत्र परीक्षा (पाठ ८ ते १४)

**विभाग - १ (गद्य) प्र.१. (अ) प्रकरण - १० (आ) प्रकरण - १३**

**विभाग - २ (पद्य) प्र.२. (अ) कविता - ८ (आ) कविता - ११**

**विभाग - ३ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती**

(१) किती छान! बाहुली आहे ही.

(२) खूप वर्षांनी परदेशातून आलेल्या भावाला पाहून सुरजचा **आनंद गगनात मावत नव्हता.** (३) आणि

**(आ) (१) (i)** गाडीवान।, धनवान **(ii)** (अ) वर्षे (आ) पुस्तके

**(iii)** (अ) शिवार (आ) दिन **(iv)** सुंदर, आवळा

(२) दाम, दाद, मद, दम, दाह

**विभाग - ४**

**प्र.४. (१) (अ)** सेवासदन विद्यालयात 'प्रजासत्ताक दिन' साजरा करण्यात आला.

**(ब)** विद्यार्थ्यांची प्रभातफेरी सहा वाजता निघाली.

**(क)** विद्यार्थ्यांनी भारतमाता, महात्मा गांधीजी, पं. जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस वेशभूषा सादर केल्या.

(२) **तुमची रोजनिशी लिहा : रविवार** – मी रविवारी सकाळी ८वाजता उठते. अंघोळ करते. देवाला नमस्कार करते. आईने बनवलेला नाष्टा करते. १० वाजता सायकल चालवायला जाते. आल्यावर थोडावेळ टीव्ही पाहते. १ वाजता आम्ही घरातील सर्व एकत्र जेवतो. दुपारी २वाजता झोपते. ४.३० ते ५ वाजेपर्यंत उठते. ५.३० वाजता मित्र मैत्रिणीं सोबत थोडावेळ खेळायला जाते. ८.३०वाजता जेवते. रात्री १० वाजता झोपते.

(३) **निबंध लेखन :** माझा आवडता छंद – पृष्ठ क्रमांक ५३ वरील निबंध पाहा.